संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





सर्व सामान्याच्या मनात आदराचे स्थान मिळविलेत... कामावरची निष्ठा सर्वांबद्दल आस्था...
प्रेम आणि आपुलकीनी गच्च भरलेलं आपलं हृदय सदैव धडधडतं दुसऱ्यासाठी...

मा.श्री. विलासराव (नाना) ताठे

आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *
श्री महालक्ष्मी मित्र मंडळ, श्री महालक्ष्मी डेव्हलपर्स
प्रभाग क्र.७ मधील सर्व नागरिक



श्री.मयूर ताठे



श्री.अरुण शिंदे (सर)



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १०.११.२०२५ | अंक नं. १८२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा

बस्ता बांधायला यायचं हं!

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™

संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



डबल फायदा
सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
Conditions Apply*
+
जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

पाहिजेत
सुवर्णक्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी.
मोड कारागीर जागा : 4 (पुरुष)
कामाची वेळ : सकाळी 10 ते रात्री 9 पर्यंत
कुठल्याही क्षेत्रातील अनुभवींना प्राधान्य.
पगार : 17000/- ते 18000/-
पेक्षाही जास्त मिळवा + पीएफची सुविधा
इच्छुक उमेदवारांनी सविस्तर अर्ज बायोडाटासह
मंगळवार ते शनिवार सकाळी 11 ते 2 यावेळेत समक्ष भेटावे.



SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965

Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite

सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999


# खा. निलेश लंके समर्थक व महाविकास आघाडीच्या डॉ.विद्या कावरे यांची पारनेरच्या नगराध्यक्षपदी निवड



पारनेर – पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत खासदार निलेश लंके यांच्या समर्थक व महाविकास आघाडीच्या डॉ. विद्या बाळासाहेब कावरे यांनी ११ विरुद्ध ६ मतांनी विजय संपादन करत नगराध्यक्षपद पटकावले.

नगराध्यक्ष नितीन अडसूळ यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली १० नोव्हेंबर रोजी विशेष सभा घेण्यात आली. उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर हे पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. हात वर करून मतदान पद्धतीने झालेल्या या निवडणुकीत डॉ. कावरे यांनी सहज विजय मिळवला. नितीन अडसूळ, जायदा शेख, सुरेखा भालेकर, योगेश मते, भूषण शेलार, प्रियंका औटी, निता औटी, सुप्रिया शिंदे, हिमानी नगरे, विद्या गंधाडे आणि स्वतः डॉ. कावरे यांनी मतदान करून डॉ. कावरे यांचा विजय निश्चित केला.

विरोधी उमेदवार अशोक चेडे यांना विजय सदाशिव औटी, युवराज पठारे, निता ठुबे, नवनाथ सोबले आणि कांताबाई ठाणगे या नगरसेवकांचा पाठिंबा मिळाला.

महायुतीकडून महाविकास आघाडीच्या नगरसेवकांना 'गळाला लावण्यासाठी' मोठे आमिष दाखवण्यात आले. लाखो रुपयांच्या ऑफर्स देत मतदानावर परिणाम करण्याचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते. तरीसुद्धा आघाडीचे नगरसेवक ठाम राहिले. राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते योगेश मते यांनी शनिवारी ९ नगरसेवकांना व्हिप बजावत डॉ. विद्या कावरे यांनाच मतदान करावे, असे निर्देश दिले होते. नगराध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर डॉ. विद्या कावरे यांचा नगरपंचायत सभागृहात सत्कार करण्यात आला. समर्थकांनी फटाके फोडत आनंदोत्सव साजरा केला. महाविकास आघाडीच्या या विजयाने पारनेरच्या राजकारणात नव्या समीकरणांची चाहूल लागली आहे. *(छायाचित्र पान २ वर)*

### हा तर निष्ठेचा विजय : खासदार निलेश लंके

खासदार नीलेश लंके यांनी नगरसेवकांच्या निष्ठेचे कौतुक करत म्हटले की, राजकारणात निष्ठा सर्वांत मोठी असते. लाखो रुपयांचे आमिष असतानाही आघाडीचे नगरसेवक डगमगले नाहीत, हीच खरी आमची ताकद आहे. डॉ. विद्या कावरे यांच्या विजयाने आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या विजयाची नांदी झाली आहे.


पाहिजेत
अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहिल्यानगर या मुख्य शोरुम साठी हवे आहेत

मॅनेजर जागा-1 (M) — पदवीधर व तत्सम पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक पगार : २० ते २५ हजार

सेल्समन जागा-5 (M/F) — तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक पगार : १८ ते २० हजार

मोड रिपेअरिंग कारागिर जागा-2 (M) — सोन्या चांदीच्या दागिन्यांची मोड घेण्याचा किंवा रिपेअरिंग करण्याचा किमान ५ वर्षे अनुभव आवश्यक. पगार : १८ ते २० हजार

अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.

शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
– सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512


## बनावट कागदपत्रांद्वारे जमीन विक्रीचा व्यवहार करत सावेडील डॉक्टरची १४.६६ कोटी रुपंयाची फसवणूक

नगर –जमीन खरेदी–विक्रीच्या व्यवहारात बनावट कागदपत्रे, खोटे मालक उभे करून आणि बनावट सह्यांच्या आधारे सावेडी येथील डॉक्टरची तब्बल १४ कोटी ६६ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात ३० जणांच्या टोळीविरोधात कटकारस्थान रचून फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार डिसेंबर २०१७ ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीत निंबळक (ता. नगर) गावच्या शिवारात घडला आहे.

याबाबत डॉ. अनिल आठरे पाटील (रा. झोपडी कॅन्टीन समोर, आठरे पाटील हॉस्पिटल, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य संशयित आरोपी भाजपाचा माजी नगरसेवक स्वप्नील शिंदे, अमोल जाधव आणि त्यांच्या इतर साथीदारांनी संगनमत करून हा कट रचला. संशयित आरोपींनी डॉ.आठरे यांच्या जमीन खरेदी–विक्रीच्या वेगवेगळ्या व्यवहारांमध्ये सुरुवातीला त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपींनी बनावट कागदपत्रे, बनावट मिळकती दाखवल्या. इतकेच नाही, तर बनावट मालक व खोटे लोक उभे करून, त्यांच्या बनावट सह्या करून फिर्यादीला दस्त हस्तांतरित केले.

या खोट्या कागदपत्रांच्या आधारे आरोपींनी डॉ. आठरे यांच्याकडून वेळोवेळी पैसे उकळले. त्यांची १४ कोटी ६६ लाख ५१ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. डॉ. आठरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी स्वप्नील शिंदे, अमोल जाधव, भाऊसाहेब नागदे, चंद्रशेखर शिंदे, सिराज (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही), दत्तु सस्ते, श्रीकांत आल्हाट, रॉकी कांबळे, सुनिल देसाई, अनिल देसाई, सुमन देसाई, ज्योती कांबळे, प्रशांत गायकवाड, महेश कुर्हे, अरूण खरात, गणेश तकडे, गणेश साबळे, लखण भोसले, विजय वैरागर, भारत फुलमाळी, रामा पवार, प्रेमचंद होनचंद कांबळे, वैशाली स्वामी, मिनल स्वामी, सुनिल वैरागर, संतोष कदम, साजीद शेख, संजय आल्हाट, सचिन शिंदे आणि इतर अनोळखी साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.


११/११

"कितीं लाभावी आपणास मोठी,
शोभून रहावी आपली हास्यमूर्ती
हिच शुभकामना आपणास शतायू होण्याची ...!"



सर्वांचे लाडके मित्र
महेशभाऊ सुरसे
एम.एस. कन्स्ट्रक्शन
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..

* शुभेच्छुक *
धिरज पोखरणा — प्रेम मोबाईल शॉपी, अहिल्यानगर
विक्रम जी. नारंग — न्यू प्रिया हॅण्डलूम, सारडा गल्ली, अहिल्यानगर
अमित विधाते — आयुर्वेदा लाकडी घाणा तेल, अहिल्यानगर
अनमोल जैन — (पोखरणा-जैन बिल्डर्स । डेव्हलपर्स) संचालक- आर्किटेक्ट्स इंजीनियर्स सर्वेयर्स एसोसिएशन, अहिल्यानगर)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करावेत

नगर – एकात्मिक आदिवासी प्रकल्प, राजूर यांच्या मार्फत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुलांसाठी चार महिन्यांच्या कालावधीचे मोफत पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज २५ नोव्हेंबर पर्यंत पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी (ता. अकोले) येथे सादर करावेत, असे आवाहन प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

हे प्रशिक्षण १ डिसेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. अर्जासोबत १२ वी उत्तीर्ण गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवासी दाखला किंवा रेशनकार्ड, डोमिसाईल प्रमाणपत्र आणि चार पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे जोडणे आवश्यक आहे. उमेदवारांचे वय १८ ते २६ वर्षांदरम्यान असावे. वजन किमान ५० किलो व उंची किमान १६५ सेंमी असावी.

निवड प्रक्रियेत शारीरिक क्षमता चाचणी (८०० मीटर धावणे) आणि लेखी परीक्षा प्रत्येकी ५० गुणांच्या असतील. दोन्ही मिळून एकूण १०० गुणांची परीक्षा होईल. उमेदवारांची निवड मेरिटनुसार करण्यात येईल. ऑफलाइन अर्ज केवळ २५ नोव्हेंबर पर्यंतच स्वीकारले जातील. त्यानंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांनी परीक्षेसाठी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, मवेशी (ता. अकोले) येथे मूळ व छायांकित कागदपत्रांसह उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी ९४२१५२५४१६, ८२७५३४९४१४ अथवा ८८०५६९८९४५ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# सरकारी–निमसरकारी कर्मचाऱ्यांची ११ नोव्हेंबर रोजी निदर्शने; मागण्या निकाली न निघाल्यास हिवाळी अधिवेशनात ‘महामोर्चा’

## प्रलंबित मागण्यांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्याचा ‘निर्धार’



नगर – महाराष्ट्र राज्यातील सरकारी–निमसरकारी, शिक्षक–शिक्षकेतर, कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभर निदर्शने करण्यात येणार आहेत. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक तासांचे निदर्शन करण्यात येणार असून, सर्व कर्मचाऱ्यांना या निदर्शनात सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन समितीचे जिल्हा निमंत्रक रावसाहेब निमसे व जिल्हा सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर यांनी केले आहे.

पूर्वनियोजित ११ नोव्हेंबरचा लाक्षणिक संप निवडणूक आचारसंहितेमुळे स्थगित ठेवण्यात आला असला, तरी आंदोलनाची दिशा आणि तिव्रता कायम ठेवण्यात येणार आहे, असे समन्वय समितीचे राज्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी स्पष्ट केले आहे. ५ नोव्हेंबर रोजी मध्यवर्ती संघटनेची राज्य कार्यकारिणी सभा घेऊन नवीन ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या ठरावानुसार आता ११ नोव्हेंबर रोजी सर्व सरकारी कार्यालयासमोर एक तासाचे निदर्शने करण्यात येणार आहे.

समन्वय समितीने स्पष्ट केले की, बदलत्या परिस्थितीत आंदोलनाचे स्वरूप बदलणे म्हणजे आंदोलन मागे घेणे नव्हे. संघशक्तीची धग कायम ठेवून पुढील टप्प्यात अधिक प्रभावी आंदोलन उभारले जाईल. समन्वय समितीने शासनाकडे सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अधिसूचना त्वरित जाहीर करावी, दहा वर्षांपासून कार्यरत सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करावे, प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती द्यावी, मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करावे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात यावे, सर्व कर्मचाऱ्यांना कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करावी, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवावी, २००५ पूर्वी व नंतर नियुक्त शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, १०–२०–३० वर्षांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करावी, १० लिपिक संवर्गातील पदोन्नती व वेतनवाढीचे धोरण सुधारावे, ११ पीएफआरडीए कायदा रद्द करून निधी राज्य सरकारकडे परत आणावा, १२ सरकारी कर्मचाऱ्यांवरील हिंसेसाठी कलम ३५३ अजामिनपात्र करावे, १३ रिक्त पदे तातडीने भरावीत, सेवाभरती नियम व आकृतीबंधांना शासन मान्यता द्यावी, १४ नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) व १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या आदेशाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

समन्वय समितीने डिसेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात नागपूर येथे महामोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला आहे. ११ नोव्हेंबरनंतर समितीची राज्यस्तरीय बैठक घेऊन पुढील रणनीती निश्चित केली जाणार आहे. सर्व जिल्ह्यांतील सरकारी, निमसरकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन या निदर्शनात सहभाग घेऊन आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

## श्रीकांत पाडळकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – सिव्हील हडको येथील पोस्ट कॉलनी समोरील रहिवासी श्रीकांत लक्ष्मण पाडळकर (वय ७५) यांचे १० नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अभिजित व अतुल पाडळकर यांचे ते वडील होत.

## उमाबाई शर्मा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – माळीवाडा येथील रहिवासी उमाबाई रमेश शर्मा (वय ६१) यांचे ९ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. बंगाल चौकी गोंधळे गल्ली येथील पूजा ब्रेक लायनरचे पुनीत व प्रतिक यांच्या त्या मातोश्री होत.



पारनेर नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. विद्या कावरे यांचा महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## गवनलाल भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन



भिंगार – राधानगरी (भिंगार) येथील रहिवासी गवनलाल डोंगरचंद भंडारी (वय ८८) यांचे ९ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ईश्वर भंडारी, सौ. अनिता राजेंद्र चोरडीया (लोणावळा) यांचे ते वडील तर जयेश, डॉ. सौरभ, हर्षदा यांचे आजोबा होत.

## सुभाषलाल भळगट यांचे हृदयविकाराने निधन



नगर – कडा येथील रहिवासी सुभाषलाल चांदमल भळगट (वय ७५) यांचे १० नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर कडा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संदीप भळगट यांचे ते वडील होत. कडा येथील संदीप जनरल स्टोअर्सचे ते संचालक होते.

## लिलाबाई बोरा यांचे वृद्धापकाळाने निधन



कर्जत – कर्जत येथील रहिवासी श्रीमती लिलाबाई सुमतीलाल बोरा (वय ७९) यांचे ९ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर कर्जत अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ६ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कर्जत येथील कापड व्यावसायिक व नगरसेवक अभय बोरा यांच्या त्या मातोश्री होत.

## सौ.ज्योती गुप्ता यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर – येथील सौ.ज्योती प्रमोदकुमार गुप्ता (वय ६०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

डावखररोड येथील गुणपती एंटरटरप्राईजेसचे मालक प्रमोदकुमार गुप्ता यांच्या पत्नी,तरुण गुप्ता यांच्या मातोश्री होत.

## बबीता मगर यांचे दु:खद निधन



शेवगाव – येथील रहिवासी बबीता रतन (अंकल) मगर (वय ७०) यांचे ६ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर शेवगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातू, २ नाती असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ‘टीईटी सक्ती’ विरोधात आणि इतर मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा मुक मोर्चा

### पुनर्विचार याचिकेची मागणी करत हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आक्रोश, टीईटी सक्ती अन्यायकारक अनुभवी शिक्षकांना पुन्हा परीक्षेची सक्ती का?

नगर – शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत महाराष्ट्र शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करण्याच्या मागणीसह इतर मागण्यांसाठी अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर ९ नोव्हेंबर रोजी मुक मोर्चा काढला. या मोर्चात शिक्षक, शिक्षकेतर हजारोफ्लच्या संख्येने सहभागी झाले होते.

नगर–संभाजीनगर रस्त्यावरील सिंचन भवन कार्यालय परिसरातून मोर्चाला सकाळी १२ वाजता प्रारंभ झाले. या मोर्चात समन्वय समितीचे सुनील पंडित, राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे बापूसाहेब तांबे, माध्यमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तथा सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघाचे विठ्ठल उरमुडे, शेखर उंडे, राजेंद्र ठोकळ, बबन गाडेकर, प्रविण झावरे, मनिषा वाकचौरे, उत्तरेश्वर मोहळकर, वैभव सांगळे, प्रसाद शिंदे, अन्सार शेख, गोकुळ कळमकर, विकास डावखरे, अमोल पवार, उत्तरेश्वर मोहोळकर आदी सहभागी झाले होते. सकाळी १० वाजल्या पासून सिंचन भवन कार्यालयाच्या परिसरात शिक्षक, शिक्षकेतर बांधव व महिला शिक्षिकांनी जमण्यास सुरुवात केली होती. यावेळी उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त करुन सरकारच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात चूकीचे धोरण राबविले जात असल्याचा व शिक्षकांना शैक्षणिक कामे सोडून इतर कामात गुंतवले जात असल्याचा आरोप करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयावर निघालेल्या मोर्चात जिल्हाभरातून शिक्षक, शिक्षकेतर बंधू भगिनी मोर्चात सहभागी झाले होते. सिंचन भवन ते जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता आंदोलनाने व्यापला होता. हातात विविध प्रकारच्या मागण्यांचे फलक घेऊन शिक्षक वर्ग मोर्चात सहभागी झाले. तर या आंदोलनातून राज्य शासनाला यापुढील काळात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा आल्यानंतर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले.

सुनील पंडित म्हणाले की, टीईटीची सर्वांना करण्यात आलेली सक्ती ही अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा दिलेल्या शिक्षकांवर अन्यायकारक आहे. महाराष्ट्र शासनाने पुनर्विचार याचिका तात्काळ दाखल करावी, अन्यथा शिक्षकांमधील असंतोष हे आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, जाचक नियम व अटीद्वारे एकप्रकारे शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे. ज्यांनी संपूर्ण हयात आपली शिक्षण क्षेत्रात घालवली व सेवानिवृत्ती जवळ आली असताना परीक्षा देण्यास भाग पाडणे हे चूकीचे आहे. गोरगरीब जनतेच्या मुलांना प्रमाणिकपणे शिक्षणातून घडवित असताना आमच्या अनुभवाची कदर न करता, लहान मुलांप्रमाणे पुन्हा शिक्षकांना अभ्यास करण्याची व परीक्षा देण्याची वेळ या राज्य शासनाने आणलेली असल्याचे स्पष्ट करुन या धोरणाचा निषेध व्यक्त केला. बापूसाहेब तांबे यांनी प्राथमिक शिक्षकांनाच टीईटी सक्ती का? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून देशातील सर्व संवर्गाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनाही ही सक्ती करण्याची मागणी केली.

महेंद्र हिंगे यांनी जुनी पेन्शन बंद करून देशातील सुमारे ५० लाख कर्मचाऱ्यांना सरकारने फसवण्याचे पाप केले आहे. जर सरकारने यापुढील काळात टीईटी सक्ती मागे घेतली नाही तर तीव्र आंदोलन उभारले जाणार आहे. देश चालविणारे राज्यातील सर्व आमदार, खासदार अधिकारी, पदाधिकारी यांनाही विविध परीक्षा सक्तीच्या करण्याचे त्यांनी सांगितले. तसेच यावेळी अनेक उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त करुन सरकारच्या शिक्षण विरोधी धोरणाचा निषेध नोफ्लदवला.

राज्य सरकारी कर्मचारी महासंघाच्या वतीने सुभाष तळेकर, रावसाहेब निमसे, अशोक मासाळ, विलास प्रेद्राम, सुरेश जेठे, मुकुंद शिंदे, पुरुषोत्तम आडेप आणि ग्रामसेवक युनियनच्या वतीने गोकुळ पाटील यांनी आंदोलनात सहभाग नोफ्लदवून पाठिंबा दिला. या आंदोलनात बबन गाडेकर, दत्तापाटील कुलट, गोरक्षनाथ विट नोर, नारायण पिसे, ज्ञानेश्वर शिरसाठ, अर्जुनराव शिरसाठ, बाबासाहेब खरात, कल्याण लवांडे, प्रकाश नांगरे, नवनाथ घुले, बाळासाहेब कापसे, राजेंद्र सदगीर, कल्याण लवांडे, संतोष खामकर, विजय काटकर, संतोष दुसुंगे, सुभाष येवले, अमोल क्षीरसागर, आबासाहेब दळवी, नवनाथ अडसूळ, प्रवीण झावरे, नाना गाढवे, साहेबराव अनाप, संतोष सरवदे, राजेंद्र निमसे आदी सहभागी झाले होते.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थापनेवरील कार्यरत इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सक्ती करणारा निर्णय दिलेला आहे. तरी शिक्षकांना न्याय मिळण्याच्या उद्देशाने उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने टीईटी संदर्भात तातडीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. १५ मार्च २०२४ ची सुधारित संच मान्यता शासन निर्णय रद्द करावा, जुनी पेन्शन योजना लागू करावी, शिक्षकांना ऑनलाइन कामे रद्द करावी, पदवीधर वेतन श्रेणी लागू करावी, शिक्षणसेवक योजना रद्द करावी व वस्तीशाळा शिक्षकांची मुळसेवा सेवाकालावधीसाठी ग्राह्य धरावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागणीचे निवेदन तहसिलदार शरद घोरपडे यांना देण्यात आले.

जशी शिक्षकांना पात्रता परीक्षा सक्तीची केली, तशी देशातील डॉक्टर, वकील, इंजिनियर, आमदार, खासदार, प्राध्यापक यांनाही अशा परीक्षा सक्तीच्या का नाहीत? याबद्दल आंदोलक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला.





शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत महाराष्ट्र शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करण्याच्या मागणीसह इतर मागण्यांसाठी अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर ९ नोव्हेंबर रोजी मुक मोर्चा काढला. या मोर्चात शिक्षक, शिक्षकेतर हजारो फ्लच्या संख्येने सहभागी झाले होते.

# गृहिणी

## आरोग्य

### उपयुक्त लवंगा...

आयुर्वेद तज्ज्ञांच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी लवंग चावल्याने गॅस, छातीत जळजळ, आंबट ढेकर येणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या दूर होतात. ते यकृत सक्रिय करते आणि पोट स्वच्छ करण्यास मदत करते. जर तुम्हालाही गॅस, छातीत जळजळ, आंबट ढेकर येणे आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या येत असतील तर तुम्ही सकाळी रिकाम्या पोटी लवंग चावून पाहू शकता. याने गॅस, छातीत जळजळ, आंबट ढेकर आराम मिळतो.

## पाककला

### पालक कोफ्ता

**साहित्य :** पालक - २०० ग्रॅम, बेसन पीठ - १ कप, हिरवी मिरची - १, आले - किसलेले, तिखट - १/४ चमचा, टोमॅटो - ४, क्रीम - १/२ कप, तेल - २-३ टेबलस्पून, कोथिंबीर, जिरे पावडर - १/२ टीस्पून, हिंग चिमूटभर, हळद - १/२ टीस्पून, धणे पावडर - १ टीस्पून, गरम मसाला - १/४ टीस्पू

कृती - सर्वात आधी कोफ्ता बनवण्यासाठी पालक चांगले धुवा. यानंतर, पालक एका प्लेटवर पसरवा आणि थोडा वेळ राहू द्या. नंतर देठ काढून टाका. नंतर पालक चिरून घ्या. आता एका मोठ्या भांड्यात बेसन घ्या आणि त्यात थोडे पाणी मिसळून जाडसर पीठ बनवा. आता बेसनाच्या पीठात बारीक चिरलेले आले, चिरलेल्या हिरव्या मिरच्या, लाल तिखट आणि अर्धा चमचा मीठ घाला आणि चांगले मिसळा. यानंतर, चिरलेला पालक घाला आणि चमच्याच्या मदतीने मिसळा. आता एका पॅनमध्ये तेल गरम करा, थोडे मिश्रण घाला आणि तेल पुरेसे गरम आहे का ते तपासा. यानंतर, गोल आकार, म्हणजेच कोफ्ते आकार घाला आणि ते तेलात घाला एका वेळी आवश्यक तितके कोफ्ते घाला आणि ते अधूनमधून सोनेरी तपकिरी होईपर्यंत तळा. आता तळलेले कोफ्ते एका प्लेटमध्ये काढा. ग्रेव्हीसाठी पॅनमध्ये २ टेबलस्पून तेल गरम करा. यानंतर, जिरे, हिंग, हळद, धणे पावडर घाला आणि परतून घ्या. नंतर टोमॅटो, आले, हिरवी मिरची पेस्ट घाला आणि मिक्स करा. आता तिखट घाला आणि मसाले मंद आचेवर परतून घ्या. तेल सुटू लागले की, क्रीम घाला आणि मसाले उकळी येईपर्यंत ढवळत राहा. ते उकळी आल्यानंतर, १-२ कप पाणी घाला आणि सतत ढवळत राहून उकळी येईपर्यंत शिजवा. यानंतर, गरम मसाला, मीठ आणि कोथिंबीर घाला. आता ग्रेव्हीमध्ये कोफ्ते घाला, मिक्स करा आणि मंद आचेवर २ मिनिटे शिजवा. तसेच, गॅस बंद करा व कोथिंबीर गार्निश करा.

## वास्तू

### कामधेनूची पूजा

* प्रार्थना कक्षाच्या ईशान्य कोपऱ्यात कामधेनुची मूर्ती ठेवणे शुभ मानले जाते.
* कामधेनु गायीला फक्त दुधापासून बनवलेले मिठाई अर्पण करा.
* कामधेनु गायीची पूजा करताना देवी लक्ष्मीची पूजा अवश्य करा.
* कामधेनुची पूजा केल्यानंतर, गोठ्यात जा आणि गायींची पूजा करा, त्यांना खीर आणि रोटी अर्पण करा.

## सौंदर्य

औषधी गुणधर्मांमुळे कोरफड त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर आहे. त्याचे अँटीबॅक्टेरियल गुणधर्म सहजपणे कोंडा दूर करू शकतात.

## सल्ला

जळलेली भांडी स्वच्छ करण्यासाठी त्यात अर्धा चमचा रांगोळी आणि अर्धा चमचा कोणतीही डिटर्जंट पावडर टाकून भांडी घासून घासावी.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, पुष्य १८।१८, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३५ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.


**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७३०० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२९९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** २) कांचन; सोने; सुवर्ण ५) भारताच्या शेजारचा उत्तरेकडील एक देश ७) विसर्जित; डिझॉल्व्ह; बंद केलेले ९) उत्तराधिकारी; हक्कदार ११) पाढ्यातील सहाची संज्ञा १२) एक केसाळ जंगली प्राणी; अस्वल १३) केव्हाही १४) रत्नजडित मंदिर; श्रीकृष्ण १५) सतेज; तेजस्वी १८) नीळकंठ; महादेव; शंकर २०) कागद वगैरेचा बाड; टिपण; यादी सिंह; केसरी २१) जंगलाचा राजा; सिंह, केसरी

**उभे शब्द :-** १) इंग्रजी वर्षाचा पहिला महिना २) मंदिर वगैरेचा सर्वोच्च भाग; शिखर ३) समाधी; थडगे; मकबरा ४) डोके, शिर ६) परीस; स्पर्शमणी ८) राज्यसभा किंवा लोकसभेचा सभासद १०) हक्कदार; शत्रू; दुष्मन; फिर्यादी १३) गुणांची पारख करणारा १५) एक धान्य १६) अनेक जनावरे जिला बांधतात ती लांबलचक एकच दोरी १७) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी १८) सवय; चाल; राबता; परिपाठ १९) रव्यापासून तयार केला जाणारा एक गोड खाद्यपदार्थ

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ज्ञान हे व्यक्तीमत्व घडवते तर अनुभव हा परिस्थिती कशी हाताळायची हे शिकवतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विरामचिन्हांचा वापर सर्वात आधी कोणत्या भाषेत केला गेला?

छपाईचा शोध लागल्यानंतर युरोपात सर्व प्रथम बायबलच्या छपाईची कामे घेण्यात आली. अत्यंत क्लिष्ट वाक्यरचना असलेली बायबलची भाषा नीट अर्थपूर्ण दिसण्यासाठी विरामचिन्हे वापरण्यात येऊ लागली. तरीही सुरुवातीला त्यात एकवाक्यता नव्हती. १९ व्या शतकापर्यंत त्यात एकवाक्यता आली आणि सर्व युरोपीय भाषा साधारणपणे सारख्या विरामचिन्हांचा उपयोग करू लागले.

आल्डस मॅन्युटिस ldus Manutius (१४४९-१५१५) याने विरामचिन्हांचा वापर पहिल्यांदा केला असे समजले जाते.

साहजिकच भारतात ती विरामचिन्हे इंग्रजांमार्फत आली. आज मराठीत वापरली जाणारी विरामचिन्हे ही आपण इंग्रजीतून घेतली आहेत. तत्पूर्वी मराठी लेखनात विरामचिन्हे वापरीत नसत. थॉमस कॅन्डी या इंग्रजाने पहिला इंग्रजी-मराठी शब्दकोश लिहिला. त्यानेच विरामचिन्हांचा उपयोग मराठीत पहिल्यांदा केला.

### मगर आणि सोन्याची नाणी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका नदीत एक मगर राहत होता. तो खूप हुशार होता. अनेक मासे खाल्ल्यानंतर, त्याला वाटले की माणसांना का खाऊ नये? एके दिवशी, एक माणूस नदीत आंघोळ करत होता. मगरीने त्याला पकडले आणि नदीत ओढले. मगरीला अनेक दिवस पुरेल इतके अन्न होते. पण त्या माणसाला खाल्ल्याची बातमी आजूबाजूच्या गावांमध्ये पसरली. आता कोणीही नदीजवळ गेले नाही. मगर खूप अस्वस्थ झाली. त्याला शिकार करण्याची संधी मिळाली नाही.

एके दिवशी, पाण्याखाली पोहताना, त्याने मासे खाण्याचा प्रयत्न केला. त्याला पाण्यात एक पिशवी दिसली. मगरीने पाहिले की ती सोन्याच्या नाण्यांनी भरलेली आहे. मगरीने एक उपाय शोधला. त्याने पिशवी त्याच्या पाठीवर ठेवली आणि पाण्याच्या पृष्ठभागावर पोहू लागला. दुपारीच्या वेळी, गावातील काही शेतकरी त्यांच्या शेतात काम करत होते. सूर्याची किरणे सोन्याच्या नाण्यांवर पडली आणि ती चमकू लागली. नदीची चमक पाहून एका शेतकऱ्याने नदीजवळ येऊन सोन्याच्या नाण्यांनी भरलेला एक गठ्ठा पाहिला. दुरून त्याला मगर दिसला नाही, जो गठ्ठ्याखाली पाण्याखाली होता.

सोन्याच्या मोहात पडलेला शेतकरी पाण्यात जाताच, मगरीने त्याचा पाय धरला आणि त्याला ओढले. मगरीचा हा नित्यक्रम बनला. तो दररोज दुपारी नदीच्या एका काठावर पाठीवर सोन्याच्या नाण्यांचा गठ्ठा घेऊन येत असे. सोन्याच्या मोहात पडलेले साधे गावकरी मगरीचे शिकार होत असत. अनेक गावांमध्ये अफवा पसरली की मगरी लोकांना शिकार करत आहे. पण इशारा देऊनही लोक नदीजवळ का जात राहिले हे कोणालाही समजले नाही.

एके दिवशी, सर्व गावकरी एकत्र आले आणि नदीकाठावर पहारा देण्यासाठी काही तरुणांना नियुक्त करण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून कोणीही आत येऊ नये. तरुणांना नदीकाठावर तैनात करण्यात आले. मगरीने हे पाहिले तेव्हा तो काही दिवसांसाठी निघून गेला. त्याने गठ्ठा दगडाखाली लपवून ठेवला.

लोक नदीकाठी तैनात असल्याने, एकही मृत्यू झाल्याची बातमी आली नाही. काही दिवसांनी लोक बेफिकीर झाले. त्यांना वाटले की मगर नदीत गेली आहे. हळूहळू, लोक नदीकाठीपासून दूर गेले आणि त्यांचे काम करू लागले. काही दिवस सर्व काही ठीक चालले, परंतु काही महिन्यांनंतर, गावकरी पुन्हा गायब होऊ लागले. यामुळे सर्वांना काळजी वाटली. गावकरी जमले आणि तक्रार करण्यासाठी राजाकडे गेले.

राजाने शहरातून दोन शिकारींना बोलावले आणि त्यांना नदीकाठी लपण्यास सांगितले. दोन्ही शिकारी मगरी येण्याची गुप्तपणे वाट पाहू लागले. पण काही दिवस ती आली नाही. मग त्यांनी काही शेतकऱ्यांशी बोलून त्यांना नदीकाठी चालण्यास सांगितले, तर शिकारींनी बारकाईने लक्ष ठेवले.

एके दिवशी, मगरी पाण्यावर तरंगताना दिसली, सोन्याच्या नाण्यांचा गठ्ठा घेऊन. नाण्यांच्या चमकाने शेतकरी आणि शिकारींना सर्वकाही समजले. दोन्ही शिकारी गठ्ठ्याजवळ लपून बसतात आणि त्यांच्या बाण सोडतात ज्यामुळे मगर मरते. सर्व गावकरी निश्चिंत होतात. राजा सोन्याच्या नाण्यांचा गठ्ठा दोन्ही शिकारींना बक्षीस म्हणून देतो.

तात्पर्य : वाईट कर्माचे फळ एक ना एक दिवस भोगावे लागते.

## जीवन का अमृत (भाग १)



### अमरत्व का विज्ञान

मैं और मेरा पिता एक समान हैं सिखों के पाँचवें गुरु अर्जुनदेव जी ने कहा था: पिता और पुत्र एक ही रंग में रंगे हुए हैं।

गुरु हम जैसा मनुष्य दिख सकता है, परन्तु वास्तव में वह प्रभु से अलग नहीं होता प्रभु से एकरूप हो कर, जीवन और मरण के रहस्य को सुलझा कर, वह हमें प्रभु तक वापिस जाने का रास्ता दिखा सकता है। एक बार जब हमारी प्रभु के लिए उत्कंठा का उत्तर एक पूर्ण सत्गुरु के रूप में मिल जाता है और वह हमें अपने चरणों में स्थान दे देता है, तो हमारी प्रार्थना का एक नया अर्थ निकलने लगता है। प्रभु के बारे में हम चाहे कितना भी क्यों न जानते हों, उसकी दया को चाहे कितना भी अनुभव क्यों न करते हो, हम ऐसे से निकट संबंध नहीं बना सकते जिसको कि हमने देखा न हो, जिसका कोई नाम न हो, कोई रूप न हो। परन्तु सत्गुरु के साथ कुछ और बात है। वह मानव चोले में काम कर रही परमात्मा की शक्ति है और हम उसे देख सकते हैं, उससे वार्तालाप कर सकते हैं।

उसको पा जाना एक ऐसा संबंध जोड़ना है जो सभी मानवीय संबंधों से बढ़-चढ़ कर है वह प्रतीत होने लगता है. एक ऐसा मित्र जो यहाँ और वहाँ के बाद भी हमें नहीं छोड़ता एक ऐसा माता-पिता है जो माता और पिता दोनों से बढ़ कर हमें अनंत प्यार देता है, एक ऐसा प्रियतम्, जिसकी एक नज़र ही हमें बदल देने की क्षमता रखती है। सत्गुरु हमारे पास मानव के स्तर पर आता है, जो कि पूर्ण प्रभु नहीं कर सकता और हम उससे बिना शर्म या हिचक के प्रार्थना कर सकते हैं, छोटी से छोटी चीज़ के लिये भी, जैसे कोई बच्चा अपने माता-पिता से माँगता है। प्रभु से संबंध कराने का आभास, जो प्रार्थना में है, वह अब मानवीय वास्तविकता धारण कर लेता है। प्यार और सब जो सत्गुरु हमें प्रदान करता है, जो अनंत दया वह हम पर करता है, उसका कोई सानी नहीं है। जितना अधिक प्यार खुले हाथों से वह हमें देता है, उतना ही अधिक हम अपनी कमियों को जानते जाते हैं। हमारी अयोग्यताओं के बावजूद सत्गुरु जो प्यार हमें देता है, उससे हम चकित हो जाते हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### मन एक रेडीयो स्टेशन है

अगर हम मन में शुभ भावना और शुभ कामना नहीं रखते हैं तो यह भी एक बाधा ब जाती है। वह लोग हमारे आसपास होते हैं इसलिए हम एक-दूसरे को मन ही मन में नकारात्मक ऊर्जा भेज-भेजकर बाधा खड़ी किए रहते हैं। इस बाधा से बचने के लिये आप जब भी हर लोगों के सामने जाते हैं या जब भी इनकी याद आती है, तुरंत मन में किसी अन्य व्यक्ति या व्यक्तियों को बाबा की याद की तरंगे भेजते रहा करो। ऐसा करने से आपके ऊपर इनकी बुरी भावनाओं का असर नहीं होगा। जब दूसरों को तरंगे देंगे तो उनसे आपको बल मिलेगा।

अपना ही अपना सोचने की प्रवृति आपके व्यक्तित्व के लिये घातक सिद्ध होगा। केवल अपने बारे सोचने की कल्पना एक अदृष्य खाई बना देती है। यही वह प्रवृति है जो अच्छे खाये बरे बनाए संबंधों में दरार डाल देती है। बाधा उत्पन्न करने वाले लोगों को आवश्यक सहयोग देते रहो। स्थूल कार्य करते रहो। अगर आप दूसरों के प्रति दुर्भावनाएं और घृणा तथा अप्रिय प्रसंगों की कल्पना करते रहते हैं तो आप अपने लिये अनेक मानसिक एवं शारीरिक व्याधियों को मोल ले लेते हैं। इन व्याधियों से बचने के लिये मन को विश्व सेवा में लगाए रखो।

सबसे खतरनाक बाधा है दुष्चिंता। ये संसार एक जंगल है। दुश्चिंता को जंगल में बिहार करने वाली एक सर्पिणी कहा गया है। ज्वालामुखी का विस्फोट होता है तो आसपास की धरती कांप उठती है। जब जीवन में दुचिता आती है तो जीवन में बाधाओं का आगमन हो जाता है। आप सड़क पर जा रहे हैं और आप सोचने लगे। कहीं ठोकर न लग जाए। कहीं गिर न जाए। कहाँ चोट न लग जाए। जरा सी गले में खिंचखिचाहट क्या हो गई आप अन्यथा सोचने लगे यही दुश्चिंता है। बरसात में बिजली कड़की नहीं कि घर की कोठरी में घुस गये यह दुचिता है। वर्षा न हुई तो फसल चौपट हो जाएगी, बहुत हानि होगी। खाने को अनाज नहीं मिलेगा। खाद बीज खरीदने के लिये धन कहाँ से आएगा।

ये सब दुश्चिंताएं हैं जो कभी जीवन में आती ही नहीं। इनकी कल्पना मात्र से दुख होता है। हमेशा इनके विपरीत आप जो चाहते हैं वह कल्पना करो। बुरी कल्पनाएं क्यों करते हो। भय, आशंका और दुष्चिंता के चक्रव्यूह में फंसने से अपने को बचाइए। जैसे ही यह विचार आये तुरंत सोचो यह चक्रव्यूह है। इसमें फंसना नहीं है। भय के विचार आये तो सोचो मैं बहादुर हूँ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : काय रे गण्या वर्गात डुलक्या देतोयस
गण्या : नाही गुरुजी गुरुत्वाकर्षणाने डोक खाली पडतयं

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

भारत सरकारच्या इक्विटीच्या स्वरुपात व्होडाफोन आयडीयाचा किती टक्के भाग आहे? - ३५.८ टक्के

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बालकांचे आजार

संगीताची समस्या तर वेगळीच होती. मोठी मुलगी आठ वर्षांची झाली, तरी तिच्यानंतर पुन्हा गर्भधारणा होत नव्हती. सर्व ठिकाणी उपचार केले तरीही गर्भधारणा झाली नाही. गर्भधारणा का होत नाही याचे निदानही झाले नाही. त्यांच्या काही तपासण्या करून घेतल्या. याच वेळा अशा रुग्णांमध्ये गर्भनलिका बंद असतात. त्यामुळे त्यांना दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. शस्त्रक्रियेदरम्यान नलिका चालू आहे हे समजले, परंतु तिच्या गर्भाशयाला जंतुसंसर्ग झाला होता. म्हणून उपचारांमध्ये आयुर्वेदिक व ॲलोपॅथिक अशी संयुक्त औषधे वापरली. त्यानंतर काही दिवसांमध्येच तिला गर्भधारणा झाली. गर्भावस्थेमध्येदेखील तिने नियमितपणे गर्भसंस्कार वर्ग चालू ठेवले व त्याचे उपचारही घेतले, त्यामुळे वय वाढलेले असूनही तिची नैसर्गिक प्रसूती झाली व एका सुदृढ निरोगी बाळाला तिने जन्म दिला.

काही रुग्णांमध्ये वंध्यत्वाचे निदान होत नसेल अशा वेळी पती-पत्नीचे पंचकर्म करून घेतले, तरी बऱ्याचशा रुग्णांमध्ये दोन-तीन महिन्यांत लगेचच गर्भधारणा होते, असा अनुभव आहे. अशा प्रकारे किचकट, त्रासदायक रुग्णांनासुद्धा संयुक्त उपचारपद्धतीमुळे अपत्यप्राप्ती होऊ शकते. माझी सर्वांना एकच विनंती आहे की, टेस्टट्यूब बेबीसारखे खर्चीक, शरीरामध्ये बरेच हार्मोनल बदल करणारे उपचार करण्याआधी एकदा तरी संयुक्त उपचारपद्धतीकडे वळावे.

स्त्रियांचा शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास रक्ताच्या योग्य प्रमाणावर अवलंबून असतो. जर रक्ताचे प्रमाण कमी झाले तर एकूणच तिच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. पर्यायाने तिच्या सर्वांगीण विकासास अडथळा निर्माण होतो. जगाच्या तुलनेत सर्वांत जास्त रक्तक्षय (ॲनिमिया) असणाऱ्या स्त्रिया भारतामध्ये आहेत. एकूण स्त्रियांपैकी ८० ते ८५% स्त्रियांमध्ये ॲनिमिया आढळून येतो. तरीही या आजाराकडे दुर्लक्ष केले जाते. कारण रक्तक्षय (ॲनिमिया) झाला तरी स्त्रियांची दैनंदिन कामे चालूच असतात.

वारंवार रक्तक्षय झाल्याने कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. काम करताना वारंवार येणारा थकवा, अशक्तपणा, अंग गळून गेल्यासारखे वाटणे, पायऱ्या चढताना दम लागणे, एखादे का करताना निरुत्साह, बळजबरीने काम करणे, केस गळणे, त्वचा रुक्ष होणे, छातीत धडधडणे, घाबरल्यासारखे होणे, एखादा विषय समजून घेण्याची ग्रहण क्षमता कमी होणे, विस्मरण होणे, चिडचिड होणे इत्यादी लक्षणे रक्तक्षय झाल्यावर दिसून येतात. हे सर्व परिणाम हळूहळू दिसतात. एकाच दिवसात शरीराला घातक परिणाम दिसत नाही.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सार्वजनिक वाहतुकीचे सामाजिक महत्त्व मानवकेंद्री विकासाचा अनिवार्य मार्ग

जगातील नागरीकरणाचा वेग दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांचा व्यापारी, औद्योगिक, शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधींमुळे विस्तार होत असताना लोकसंख्येचे स्थलांतर, वस्त्यांची वाढ, दैनंदिन व्यवहारांमध्ये गुंफणारे आयुष्य आणि ताणतणावांनी भरलेला आधुनिक काळ यामधून होणारा प्रवास हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर १० नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा 'जागतिक सार्वजनिक वाहतूक दिन' केवळ वाहतुकीची सोय किंवा सुविधा यापुरता मर्यादित न राहता समाज, अर्थव्यवस्था, पर्यावरण, संस्कृती आणि विकास या सर्वांवर परिणाम करणाऱ्या वाहतूक प्रणालीच्या सामाजिक अर्थपूर्णतेकडे मानवी दृष्टीने पाहण्याची एक महत्त्वपूर्ण संधी निर्माण करतो. सार्वजनिक वाहतूक म्हणजे केवळ बस, रेल्वे, मेट्रो, ट्राम किंवा सार्वजनिक सायकल नेटवर्क एवढेच नव्हे, तर सामूहिक वापर, समान सहभाग आणि सबलीकरण यांची सामाजिक प्रक्रिया आहे. नागरिकांच्या सर्व घटकांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या केंद्रस्थानी आणणारा हा लोकशाहीवादी वाहतुकीचा मार्ग आहे.

आपल्या देशात आणि जगभरात वाढते खासगीकरण, वेगाने वाढणारी चारचाकी वा दुचाकी वाहने, रस्त्यांवरील रहदारीची कोंडी, प्रदूषणाचे प्राणघातक स्तर, संसाधनांचा अनियंत्रित वापर आणि वाढता इंधन खर्च यामुळे समाज अनेक संकटांसमोर उभा आहे. खासगी वाहनांचा वापर हा 'सोयीचा' वाटत असला, तरी तो समाजासाठी व पृथ्वीसाठी 'महागडा' ठरत आहे. खासगी वाहनाचं मालकत्व हे वैयक्तिक प्रतिष्ठा किंवा सामाजिक स्थानाचे प्रतीक मानण्याची प्रवृत्ती वाढत गेली, आणि त्यातून सामूहिकतेपेक्षा वैयक्तिकतेला' अधिक महत्त्व देण्याची वृत्ती अधिक बळकट झाली. परंतु सामाजिक आयुष्याचे खरे स्वास्थ्य हे सर्वांसाठी उपलब्ध, परवडणारी आणि समतोल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यावर अवलंबून आहे. कारण सार्वजनिक वाहतूक ही केवळ प्रवासाची पद्धत नसून ती समाजातील असमानता कमी करण्याचे प्रभावी साधन आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता वाहतूक ही सामाजिक संरचनेचा पाया आहे. शहराचे समाजशास्त्र, ग्रामीण–शहरी अंतर, स्त्री–पुरुष समानता, शिक्षण–अभ्यास–रोजगाराच्या संधींतील समानता, आर्थिक गतिशीलता, सामाजिक परस्परसंबंध आणि पर्यावरणपूरक जीवनशैली हे सर्व वाहतूक व्यवस्थेशी खोलवर निगडित आहेत. उदा. ज्यांच्या राहण्याची व्यवस्था शहरापासून दूर किंवा उपनगरात असते, त्यांना रोजगार, शिक्षण किंवा आरोग्यसेवांपर्यंत पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक ही जीवनरेखा ठरते. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सार्वजनिक वाहतूक ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे, तर महिलांसाठी ती सुरक्षिततेचे कवच आहे. ग्रामीण भागातील मजुरी करणारे लोक, शिक्षणासाठी शहरात येणारे विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे कर्मचारी, उद्योगात काम करणारे कामगार, वृद्ध, विद्यार्थी, महिला, दिव्यांग या सर्वांसाठी सार्वजनिक वाहतूक म्हणजे जीवनाला जोडणारा पूल आहे.

भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार आणि गुणवत्ता ही आर्थिक विकासाची किल्ली ठरते. बेंगळुरू, पुणे, मुंबई, दिल्ली, नागपूर यांसारख्या शहरांत मेट्रो, बीआरटीएस, ई–बस, सब–अर्बन रेल्वे आदी प्रकल्प समाजाला पुढे नेण्याचे उदाहरण आहेत. सार्वजनिक वाहतुकीचा दर्जा जिथे चांगला असतो तिथे लोकांचा प्रवास सुखकर, प्रदूषण कमी, कामाच्या संधी वाढलेल्या आणि मानसिक ताण कमी झालेला दिसतो. परंतु याच वेळी, अनेक शहरांत सार्वजनिक वाहतुकीची अवस्था अजूनही अपुरी व विस्कळीत आहे. बसेस कमी, रेल्वे गाड्यांमध्ये गर्दी, बसस्थानकांची दुरवस्था, सुरक्षा उपायांचा अभाव, अपंगांसाठी सुविधा नसणे, प्रवासाची अस्वस्थता यामुळे अनेक लोक सार्वजनिक वाहतुकीकडून दूर जातात. या परिस्थितीने खासगी वाहनांचा वापर वाढतो, आणि वाहतूक कोंडी, अपघात, प्रदूषण, वेळेचा अपव्यय, ताणतणाव या समस्या वाढत जातात. म्हणूनच, सार्वजनिक वाहतुकीत गुंतवणूक हा खर्च नसून समाजाची भविष्यातील गुंतवणूक आहे.

खासगी वाहनांमुळे होणारे वायूप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, जैवविविधतेचा नाश, तापमानवाढ, हवामान बदल, भूमीचे व्यापारीकरण आणि पेट्रोल–डिझेलवरील अवलंबित्व हे संपूर्ण मानवजातीपुढील मोठे धोके आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालांनुसार प्रदूषित हवेचे दुष्परिणाम हे श्वसनविकार, हृदयरोग, कर्करोग, स्ट्रोक यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरतात. जर सार्वजनिक वाहतूक मजबूत, सुबक आणि सुलभ असेल तर लाखो लोक खासगी वाहनांचा वापर सोडण्यास तयार होतात. यामुळे पर्यावरणाचे रक्षण, सार्वजनिक आरोग्य सुधारणा आणि संसाधनांचा शाश्वत वापर साध्य होऊ शकतो.

आजच्या काळात ई–बस, सायकल–शेअरींग, कारपूलिंग, मेट्रो रेल्वे, हरित ऊर्जा आधारित वाहतूक व्यवस्था आणि स्मार्ट तिकिटिंग प्रणाली यांचा वापर वाढू लागला आहे. तंत्रज्ञान आणि वाहतूक व्यवस्थापनाचा संगम हा भविष्यातील वाहतुकीचा पाया आहे. पण तंत्रज्ञानाचा वापर हा माणसांना केंद्रस्थानी ठेवूनच झाला पाहिजे. वाहतूक हे फक्त वाहनांचे व्यवस्थापन नाही; ती लोकांच्या चालण्याची, जगण्याची आणि समाजाशी जोडले जाण्याची प्रक्रिया आहे.

महिला आणि सार्वजनिक वाहतूक हा एक महत्त्वाचा विषय आहे. सुरक्षित, स्वच्छ, प्रकाशयुक्त, सुरक्षा यंत्रणांनी युक्त, महिलांसाठी अनुकूल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी अत्यावश्यक आहे. अनेक वेळा असुरक्षिततेमुळे महिला शिक्षण, नोकरी किंवा सामाजिक सहभाग यांपासून दूर राहतात. म्हणूनच सुरक्षित सार्वजनिक वाहतूक ही स्त्री–पुरुष समानता घडविण्यासाठी महत्त्वाची कडी आहे.

ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक अधिकच महत्त्वपूर्ण ठरते. तिथे लोक शेती, मजुरी, बाजारपेठ, शाळा, रुग्णालये, सरकारी सेवांपर्यंत पोहोचण्यासाठी बस, सामुदायिक वाहने किंवा स्थानिक सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून असतात. ग्रामीण वाहतुकीची कमतरता ही ग्रामीण भागातील लोकांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागे ठेवते. त्यामुळे ग्रामीण वाहतुकीचा विकास हा ग्रामीण विकासाचा मूलाधार मानला पाहिजे.

सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग केवळ प्रवासातच नाही तर सामाजिक संवाद वाढण्यातही होतो. बसमध्ये किंवा रेल्वेत प्रवास करताना विविध स्तरातील, मतांतील, संस्कृतीतील लोक एकत्र येतात. त्यातून सामाजिक एकजूट, संवाद आणि सांस्कृतिक समन्वय निर्माण होतो. खासगी वाहनांमुळे निर्माण होणारा 'एकाकीपणा' इथे कमी होतो. म्हणजेच सार्वजनिक वाहतूक ही लोकांना जोडणारी लोकशाहीवादी जागा आहे.

आजच्या तरुण पिढीसमोर पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि आरोग्य याबाबत चिंतेचे प्रश्न आहेत. अशावेळी सार्वजनिक वाहतूक स्वीकारणे हे सामाजिक जबाबदारीचे पाऊल मानले पाहिजे. जागतिक स्तरावर 'ग्रीन मोबिलिटी', 'कार्बन न्यूट्रल सिटी', 'सस्टेनेबल अर्बन डेव्हलपमेंट' यांसारख्या संकल्पना विकसित होत आहेत. त्यांचा मूळ केंद्रबिंदू सार्वजनिक वाहतुकीवर आधारित शहररचना आहे.

सारांशतः, सार्वजनिक वाहतूक ही आधुनिक समाजाच्या चौफेर प्रगतीसाठी अनिवार्य आहे. ती समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, आर्थिक विकास, सांस्कृतिक बंध, आरोग्य व जीवनमान सुधारणा यासाठी संधी निर्माण करणारी समाजाचा कणा आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीला केवळ सेवा म्हणून नव्हे, तर जनहिताचा अधिकार, लोकशाहीचा आधारस्तंभ आणि शाश्वत विकासाचा मार्ग म्हणून मान्यता दिली पाहिजे.

आज 'जागतिक सार्वजनिक वाहतूक दिन' हा केवळ स्मरण आणि औपचारिकता न राहता, नागरिक, सरकार, शहररचना तज्ञ, वाहतूक अधिकारी, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, आणि जनसामान्य यांनी एकत्रितपणे सार्वजनिक वाहतुकीच्या सशक्तीकरणाची प्रतिज्ञा घ्यायला हवी. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवून, ती अधिक सुरक्षित, सुलभ, स्वच्छ, परवडणारी आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे. कारण सार्वजनिक वाहतूक मजबूत झाली, तर समाज मजबूत होईल; समाज मजबूत झाला, तर मानवजातीचा भविष्यकाळही अधिक सुरक्षित, समतोल आणि शाश्वत होईल.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगमुळे क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन : पंकज आशिया

**नगर क्लब येथे नमोह फुटबॉल क्लबतर्फे उदयोन्मख फुटबॉलपटूंना प्रशिक्षण देऊन स्पर्धेचे आयोजन**



नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने आयोजित अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी पंकज आशिया.

नगर – खेळ आपल्याला शारीरिक तंदुरुस्ती देतो. आपला आवडता खेळ क्रिकेट आणि बॅडमिंटन असून त्याचा सराव आपण व्यायाम करून नियमितपणे करतो. भारताच्या क्रीडा क्षेत्रात फुटबॉल हा देखील सर्वांगाला व्यायाम देणारा आणि सांघिक प्रेरणा जागवणारा सर्वोत्तम खेळ आहे. नमिता फिरोदिया यांच्या नमोह फुटबॉल क्लब तर्फे आयोजित अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगमुळे नगरच्या क्रीडा क्षेत्राला चालना मिळेल आणि नवदूत खेळाडूंना प्रोत्साहन असे गौरवउद्गार जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी काढले.

नगर क्लबच्या मैदानावर नमोह फुटबॉल क्लब च्या वतीने अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. नगर मधील नमिता फिरोदिया यांनी स्पर्धे चे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या पत्नी सौ. मोनिका आशिया, अ.ए. सोसा. च्या प्रमुख श्रीमती छायाताई फिरोदिया, इंडियन स्पोर्ट्स डिव्हिजनचे हेड ऑफ स्कूल स्पोर्ट्स लॉरेन्स बीज, अभिनेत्री हेमल इंगळे उपस्थित होते.

लॉरेन्स वीज म्हणाले की ही स्पर्धा खूप जबरदस्त होणार आहे. महाराष्ट्रातील मोठ्या स्पर्धांना लाजवेल असे चोख संयोजन या स्पर्धेचे करण्यात आले आहे. नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन आणि चालना मिळेल. चांगले खेळाडू यातून घडतील असा विश्वास आपल्याला आहे.

राष्ट्रगीताने उद्घाटन समारंभास सुरुवात झाली. नंतर उपस्थित खेळाडूनी पाहुण्यांना मानवंदना दिली. त्यानंतर अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले. आकाशात फुगे सोडण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते टॉस करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली.

स्पर्धेत आरडीएक्स जूनियर्स, मुनोत स्ट्रायकर्स, जी सी फायटरस, गुलमोहर चॅलेंजर्स, विद्यादान अल्फा एक्स, गांधी वॉरियर्स, कॉन प्लेक्स सुपरहिरोज, लोढा स्ट्रायकर्स या संघाच्या मालकानी लिलावातून खेळाडूंना आपल्या संघासाठी विकत घेतले. या लिलावात ए डब्ल्यू जी ग्रुप चे ऋत्विक वाबळे, एन बी एस फ्लेक्झिबल सोल्युशन्स चे सिद्धार्थ मुनोत गुलाबचंद कार्पेट वाला चे दर्शन भंडारी गुलमोहर स्पोर्ट्सचे जोहेब खान, विद्याधाम क्लासेसचे रोहित रामदिन आणि भावेश मिश्रा प्रोस्पोस्पर्स चेतन गांधी, कॉनफ्लेक्स थिएटर चे प्रणील मुनोत, राखी लोढा आणि दीपिका लोढा यांचा सहभाग होता. फुटबॉलपटूंना प्रशिक्षण देऊन त्यानंतर त्यांना स्पर्धेत प्रवेश देण्यात आला. स्पर्धेचा हा सातवा सिझन असून नमिता फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली नमोह फुटबॉल क्लब, सिद्धार्थ वांद्रे व ऋत्विक चव्हाण हे ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

# विजय भालसिंग यांना समाजसेवक पुरस्कार जाहीर



नगर – बहुजन भूमी संघटना व दक्ष पोलीस मित्र संघाच्या वतीने येथील विजय भालसिंग यांना समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. वानवडी पुणे येथील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात २२ नोव्हेंबर रोजी पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष कैलास पठारे, राष्ट्रीय महिला अध्यक्षा रोहिणीताई भोसले, राष्ट्रीय उपाध्यक्ष रशिद पठाण, राष्ट्रीय युवक अध्यक्ष राहुल पाईकराव व राष्ट्रीय वरिष्ठ महिला अध्यक्ष कीर्ती पांडे यांनी दिली.

विजय भालसिंग सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकापासून योगदान देत आहेत. वाळकी (ता. नगर) येथील असलेले भालसिंग एसटी बॅकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे योगदान देत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते कार्य करत आहे. आषाढी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीची सेवा करत आहे. तसेच वाळकी पंचक्रोशीतील विविध प्रश्नांवर आवाज उठवून ते सोडविण्यासाठी शासकीय स्तरावर देखील ते पाठपुरावा करत आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



माजी सैनिक मनसुख वाबळे व सौ.शालिनी वाबळे यांच्यावतीने मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन बालरोगतज्ञ डॉ. रामदास बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. राहुल पंडित, डॉ. अतुल खालकर, डॉ. अरविंद अनचवले, नेत्रतज्ञ डॉ. प्रफुल चौधरी, डॉ. अमित करडे, माजी सैनिक मनसुख वाबळे, सौ. शालिनी वाबळे, सागर वाबळे. (छाया – उदय जोशी)

# वाबळे दांम्पत्याचा उपक्रम कौतुकास्पद व अभिमानास्पद

**बालरोगतज्ञ डॉ. रामदास बांगर यांचे प्रतिपादन; माजी सैनिक मनसुख वाबळे व सौ.शालिनी वाबळे यांच्यावतीने मोफत आरोग्य शिबिरास प्रतिसाद**

नगर – वाबळे दांम्पत्याचा हा उपक्रम कौतुकास्पद व अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन डॉ. रामदास बांगर यांनी केले. ज्या समाजात आपण रहातो त्या समाजाकरीता केलेला उपक्रम महत्वाचा आहे. आजच्या वेगवान जीवनशैलीत नागरिक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत. आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा नियमित तपासणी करून रोग लवकर बरा करावा समाजात आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी अश्या शिबिराचे आयोजन गरजेचे आहे. नियमित व्यायाम संतुलित आहार आणि तणावमुक्त जीवनशैली अंगीकारल्यास अनेक आजारापासून बचाव होउ शकतो.

स्थानिक नागरिकांच्या आरोग्यविषयक जाणीवेत वाढ व्हावी या हेतूने आम्रपाली मंगल कार्यालयात माजी सैनिक मनसुख वाबळे व सौ.शालिनी वाबळे यांच्या वतीने मोफत सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन बालरोगतज्ञ डॉ. रामदास बांगर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. राहुल पंडित, डॉ. अतुल खालकर, डॉ. अरविंद अनचवले, नेत्रतज्ञ डॉ. प्रफुल चौधरी, डॉ. अमित करडे, माजी सैनिक मनसुख वाबळे, सौ.शालिनी वाबळे, सागर वाबळे आदी उपस्थित होते.

शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन, हाडांची घनता, दृष्टी व वजन तपासणी या विविध चाचण्या मोफत करण्यात आल्या. तब्बल २५० हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शालिनी वाबळे म्हणाल्या, आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे अशा मोफत आरोग्य शिबिरांची गरज प्रत्येक वसाहतीमध्ये आहे. नियमित तपासणी करून आपले आरोग्य सांभाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

मनसुख वाबळे म्हणाले, सामाजिक बांधिलकी म्हणून हे शिबिर आयोजित केले आहे. लोकांना आरोग्याबाबत जागरूक करण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुढेही विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचे आमचे नियोजन आहे.

शिबिर यशस्वीतेसाठी कार्यकर्ते, स्वयंसेवक व डॉक्टरांचा सहभाग लाभला. नागरिकांनी शिबिराबद्दल समाधान व्यक्त करत, अशा उपक्रमांची पुनरावृत्ती व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. गुलमोहोर रोड परीसरातील ज्येष्ठ नागरिक आले होते.

भारतीय माजी सैनिक संघटना, प्रहार माजी सैनिक संघटना, त्रिदल माजी सैनिक संघटना, जय हिंद सैनिक फाउंडेशन अहमदनगर नवीन वेटर्न्स संघटना, अहिल्यानगर नौसेना वेटर्न्स गुपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# गोविंदराव जोशी यांच्या अभिष्टचिंतनानिमित्त 'भगवतगीतेच्या ग्रंथा'ची आणि 'गुळाची तुला'

**उपस्थितांना गीतेच्या ग्रंथासोबत गुळाची भेट**





गोविंदराव जोशी यांची अभिष्टचिंतन सोहळ्यात भगवतगीतेच्या ग्रंथाची व गुळाची तुला करण्यात आली.

नगर – येथील सविता रमेश फिरोदिया प्रायमरी स्कूलचे सेवानिवृत्त उपशिक्षक गोविंदराव केशव जोशी यांचा ७५ वा अभिष्टचिंतन सोहळा टिळक रोड वरील पटेल मंगल कार्यालयात पार पडला. या सोहळ्यात श्रीमद् भगवतगीता ग्रंथ आणि गुळाच्या ढेपी ठेवून त्यांची तुला करण्यात आली. या ग्रंथाची आणि गुळाची उपस्थितांना भेट देण्यात आली. ७६ दिव्यांनी त्यांना औक्षण करण्यात आले.

सौ.शिल्पा मोकाशी व सौ.पूजा मुरडे यांनी स्वागत केले. बी.एम.कुलकर्णी यांनी प्रास्ताविक करताना गोविंदराव जोशी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत ३४ वर्षे शिक्षण क्षेत्रात नोकरी केली. उपशिक्षक म्हणून ते निवृत्त झाले, अशी माहिती दिली.

बळवंत हिलगुडे म्हणाले, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन आणि सचिवपद तसेच शिक्षक महासंघाच्या नगर जिल्हा शाखेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी समर्थपणे धुरा सांभाळली.

बाजीराव जाधव म्हणाले, महापालिकेने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविले होते. प्रौढ शिक्षणाचे वर्ग घेतल्याबद्दल शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी त्यांचा सन्मान केला होता. विधानसभेचे तत्कालीन सभापती प्रा.ना.स.फरांदे यांच्या हस्ते गोविंदराव जोशी यांचा सत्कार झाला होता. आज त्यांच्या मुलींनी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन केले, ही विशेष कौतुकाची बाब आहे.

यावेळी प्रभाकर खणकर, सुनिल जोशी, रघुनाथ ठोंबरे आदींची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एम.कुलकर्णी यांनी केले. सौ.पूजा मुरडे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास माजी उपमहापौर सौ. गीतांजली काळे, डॉ.महेश जोशी, शंकरराव जोशी, आगरकर मळा ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष अशोक आगरकर, सचिव शिवाजीराव ससे, संचालक नाना दळवी, दत्तात्रय फुलसौंदर, बाळकृष्ण पात्रे, पी.डी. कुलकर्णी, सुभाष तांबोळी, सुभाष कुलकर्णी यांच्यासह शिक्षक, नातेवाईक, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# आत्मध्यानातून स्वत:ची खरी ओळख होते : डॉ. श्री शिवमुनीजी

**आत्मध्यान धर्मयज्ञाने आनंदधाम बनले ध्यानमय, आत्मचिंतन, अंतर्मन शुद्धी व समाधीचा दिव्य संगम**

नगर – आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांचे शिष्य तसेच महाराष्ट्र प्रवर्तक महाश्रमण श्री कुंदनऋषिजी म.सा. यांच्या ९२ व्या जन्मदिनानिमित्त आनंदधामच्या पावन भूमीवर ९ नोव्हेंबर रोजी आत्मध्यान धर्मयज्ञ हा आध्यात्मिक सोहळा उत्साहात पार पडला. या प्रसंगी युगप्रधान, आचार्य सम्राट, ध्यानयोगी डॉ. श्री शिवमुनीजी म.सा. यांच्या प्रेरणेत व मार्गदर्शनाखाली आनंदधाम येथे लाईव्ह आत्मध्यान साधना आयोजित करण्यात आली होती. देशभरातील साधक–साधिकांनी उदयपूर, पुणे, लुधियाना, भटिंडा नासिक, सूरत आदी ठिकाणांहून साधारण १४०० साधकांनी या ऑनलाइन साधनेत सहभाग घेतला. संपूर्ण परिसर ध्यानमय वातावरणाने भारला होता. प्रत्येक साधकाला अंतर्मनातील शांतता आणि समाधानाची अनुभूती यातून लाभली.

डॉ. श्री शिवमुनीजी यांनी आपल्या प्रवचनातून साधकांना आत्मध्यानाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, आत्मध्यान साधनेत प्रत्येक समस्येचे निराकरण सामावलेले आहे. आत्मध्यानातून 'मी कोण आहे?' या प्रश्नाचे उत्तर सापडते. ही साधना आपल्याला आत्मचिंतन आणि आत्मजागृतीकडे नेते.



आचार्य श्री आनंदऋषिजी म.सा. यांचे शिष्य तसेच महाराष्ट्र प्रवर्तक महाश्रमण श्री कुंदनऋषिजी म.सा. यांच्या ९२ व्या जन्मदिनानिमित्त आनंदधामच्या पावन भूमीवर आत्मध्यान धर्मयज्ञ हा आध्यात्मिक सोहळा उत्साहात पार पडला.

त्यांनी पुढे सांगितले की, आत्मध्यान धर्मयज्ञ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, आत्मशुद्धी, संयम, समाधान आणि अध्यात्मिक उन्नतीचा दिव्य संगम आहे. या साधनेतून साधकाला अंतर्मनातील शांततेचा आणि समाधीचा अनुभव मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी साधिका निशा जैन यांनी अरिहंत वाणी तून आत्मबोध दिला. प्रमुख मंत्री शिरीष मुनीजी महाराज यांनीही प्रबोधन करून साधकांना आध्यात्मिक मार्गावर दृढ राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विनायकनगर जैन श्रावक संघाने पुढाकार घेतला. तसेच रमेशलाल चंदनमल गुंदेचा, विमल गुंदेचा परिवार, आनंद कटारिया परिवार, सचिन भळगट, सुरेशलाल मानकचंद कटारिया, विजयकुमार शांतीलाल गुंदेचा, डॉ. सपना गुगळे, मोना चोपडा, सौ. छाया मुथा, पारस गुंदेचा आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या अखेरीस साधक–साधिकांनी आत्मध्यानाच्या माध्यमातून साधलेला शांततेचा अनुभव व्यक्त केला.

# स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आजाद आणि ऐतिहासिक अहमदनगर



इतिहासाच्या पानांवर काही नावे अशी कोरली गेली आहेत जी काळ आणि अवकाशाच्या पलीकडे गेली आहेत. त्यांचा उल्लेख झाला की मनात ऊर्मी येते, विचारांना दिशा मिळते आणि आत्म्यात प्रकाश उतरतो. त्या तेजस्वी नावांपैकी एक नाव म्हणजे मौलाना अबुल कलाम आजाद.. त्यांनी गुलामगिरीच्या अंधारात श्रद्धा आणि ज्ञानाचे दिवे पेटवले, त्यांच्या शब्दांनी निद्रिस्त राष्ट्राला जागृत केले, आणि त्यांच्या विचारांनी धर्म आणि मानवतेच्या मध्ये असा पूल बांधला ज्यावर चालून राष्ट्रांनी एकतेचा अर्थ जाणला.

### अहमदनगरचा किल्ला गुलामगिरीच्या भिंतींमध्ये स्वातंत्र्याचा आवाज

मौलाना आझाद यांच्या जीवनातील एक अध्याय असा आहे ज्याने त्यांच्या विचारांना अमरत्व दिले. तो अध्याय म्हणजे अहमदनगरच्या किल्ल्यातील कैद. दख्खनमधील हे प्राचीन आणि ऐतिहासिक शहर, जिथे अनेक सत्तांच्या कथा घडल्या. पण या किल्ल्याची खरी ओळख झाली ती तेव्हा, जेव्हा इथे भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामातील महान नेत्यांना कैद करण्यात आले. त्यात मौलाना अबुल कलाम आजाद ही होते.सन १९४२ भारत छोडो आंदोलन आपल्या शिखरावर होते. इंग्रजांनी सर्व नेत्यांना अटक केली. नेहरू, सरदार पटेल, मौलाना आजाद आणि इतर स्वातंत्र्यसेनानींना अहमदनगरच्या किल्ल्यात नजरकैद करण्यात आले. मात्र, या सर्वांमध्ये एक चेहरा असा होता ज्याच्या डोळ्यांत विश्रांती नव्हती, तर सतत जागरूकतेचा प्रकाश होता. तो म्हणजे मौलाना आजाद.

हा किल्ला आता केवळ दगडांचा बांधकाम नव्हता, तर स्वातंत्र्यलढ्याचा मूक साक्षीदार झाला होता. मौलाना आजाद जेव्हा या कैदेत आले, त्यांच्या जवळ काही पुस्तके, काही कागद आणि एक पेन होते. पण त्यांच्या अंतःकरणात होती एक पूर्ण दुनिया श्रद्धेची, ज्ञानाची, स्वातंत्र्याची.

एका रात्रीचा प्रसंग इतिहासात अजरामर झाला, मौलाना वाचनात मग्न होते. किल्ल्याच्या भिंतींवर गाढ शांतता होती. एक पहारेकरी हळूच पुढे आला आणि म्हणाला, मौलाना, खूप रात्र झाली आहे, आता झोपा. मौलाना आजाद हलकेसे हसले, दिव्याची वात उंच केली आणि म्हणाले:

मी कसा झोपू, जेव्हा माझं राष्ट्र अजून झोपलेलं आहे? हा वाक्य केवळ क्षणिक नव्हता, तो इतिहासाचा प्रकाशमान क्षण होता. त्या एका वाक्याने त्यांनी संपूर्ण राष्ट्राच्या आत्म्यात ज्योत पेटवली.

### 'गुबार-ए-खातीर' कैदेच्या एकांतातून झळकलेला ज्ञानाचा प्रकाश

अहमदनगरच्या कैदेतील दिवस मौलानांसाठी संकट नव्हते, तर सर्जनशील साधना होती. त्या काळात त्यांनी त्यांच्या विचारांचे आणि चिंतनाचे अमर शब्द गुबार-ए-खातीर या ग्रंथात नोंदवले. हे जरी पत्रांच्या स्वरूपात लिहिले गेले, तरी प्रत्यक्षात ते संपूर्ण राष्ट्रासाठीचा संदेश होता. या लेखनात तत्वज्ञान आहे, श्रद्धा आहे, राजकारण आहे, काव्य आहे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे मानवतेचा सुगंध आहे. त्यांनी स्वतःला कैदी मानले नाही, तर त्या किल्ल्याला आपले विद्यालय आणि मिहराब मानले.

### धैर्य आणि त्यागाचा सर्वोच्च क्षण

कैदेत असताना मौलानांना समजले की त्यांची पत्नी अत्यंत आजारी आहे. त्यांनी इंग्रज सरकारकडे मागणी केली की त्यांना भेटण्याची परवानगी द्यावी, पण ती नाकारण्यात आली. काही दिवसांनी त्यांच्या पत्नीचे निधन झाले. अधिकाऱ्याने विचारले, तुम्हाला अंत्यसंस्कारासाठी जायचे आहे का? मौलाना शांतपणे म्हणाले: जेव्हा त्या जिवंत होत्या आणि त्यांना माझी गरज होती, तेव्हा तुम्ही परवानगी दिली नाही. आता त्या नाहीत. आज माझ्या देशाला माझी गरज आहे. हा प्रसंग केवळ पतीचा धैर्य नव्हता, तर राष्ट्रसेवकाचा संकल्प होता जो व्यक्तिगत दुःखापेक्षा राष्ट्राच्या सेवेला वर मांडतो.


मौलानांचे विचार श्रद्धा, ज्ञान आणि स्वातंत्र्य यांचे त्रिवेणी संगम होते. मौलाना आझाद यांची राजकारणाची वाटचाल ही त्यांच्या आध्यात्मिकतेचा विस्तार होती. त्यांना सत्ता नव्हती हवी, सेवा हवी होती. ते म्हणायचे: राजकारण जर नैतिकतेपासून रिकामे असेल, तर ते व्यापार आहे, सेवा नाही. त्यांच्या दृष्टीने धर्म हा विभाजनाचा नव्हे, एकतेचा मार्ग होता. त्यांचे मत होते की खरे स्वातंत्र्य केवळ इंग्रजांपासून नाही, तर अज्ञानापासून मुक्त होण्यात आहे. शिक्षण मौलानांनी प्रत्येक घरासाठी पेटवलेला दिवा होता. स्वातंत्र्यानंतर जेव्हा ते देशाचे पहिले शिक्षणमंत्री झाले, त्यांनी म्हटले: शिक्षणाशिवाय स्वातंत्र्य हा एक अपूर्ण स्वप्न आहे. त्यांच्या प्रयत्नांनी युजीसी, आय आय टी, वैज्ञानिक संशोधन संस्था आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणे जन्माला आली. त्यांना हवे होते की प्रत्येक बालकाच्या हातात पुस्तक असावे आणि प्रत्येक अंतःकरणात ज्ञानाची तहान.

नगर आणि मौलाना एक चिरंतन बंधन होते. नगरच्या किल्ल्यात मौलाना कैद झाले, पण त्या कैदेतूनच ते अमर झाले. आजही त्या किल्ल्याच्या भिंतींवर त्यांचा आवाज घुमतो. की जागा हो, कारण तुझी झोप म्हणजे तुझी गुलामगिरी, आणि तुझे ज्ञान म्हणजे तुझे स्वातंत्र्य.

नगरचा प्रत्येक दगड सांगतो इथे एकदा असा दीप पेटला होता ज्याच्या प्रकाशाने पिढ्यांना जागवले.

– **डॉ. कमर सुरूर,** लेखक कवी साहित्यिक, नगर

# शिक्षण दिन : मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्मदिन



आज ११ नोव्हेंबर आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. कारण आजच्याच दिवशी म्हणजे ११ नोव्हेंबर १८८८ रोजी भारताचे पहिले शिक्षण मंत्री, थोर देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी मौलाना अबुल कलाम आझाद यांचा मक्का येथे जन्म झाला. मौलाना आझाद यांचे मूळ नाव अबुल कलाम मोहिनुद्दीन असे होते. अबुल कलाम ही त्यांना पदवी मिळाली होती. अबुल कलाम म्हणजे वाचस्पती. पुढे त्यांनी स्वतःच्या नावापुढे आझाद लावले. त्यांचे वडील हे भारतीय होते तर आई अरब होती.

अबुल कलाम आझाद यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. अगदी लहान वयातच त्यांनी अरबी, फारसी आणि उर्दू या भाषांचे ज्ञान मिळवले. त्यांना तर्कशास्त्र, तत्वज्ञान आणि गणित विषयांची आवड होती तसेच इस्लाम धर्माचा त्यांना गाढा अभ्यास होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर मौलाना अबुल कलाम आझाद यांनी पत्रकारिता सुरू केली. इंग्रजी सत्तेच्या अन्याय अत्याचाराविरोधात जनजागृती करावी यासाठी त्यांनी अल हिलाल नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून ते इंग्रजांविरुद्ध रान पेटवत असत. त्यामुळे इंग्रज सरकारने त्यावर बंदी घातली. काही दिवसांनी त्यांनी अल बलाग नावाचे दुसरे साप्ताहिक सुरू केले. ते आपल्या लेखणीतून इंग्रज राजवटीविरुद्ध जनतेला जागृत करीत. मुस्लिम समाजानेही स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घ्यावा यासाठी ते मुस्लिम तरुणांना प्रोत्साहित करीत.

अबुल कलाम आझाद यांना इस्लाम धर्माचा गाढा अभ्यास असल्याने त्यांनी आपल्या धर्माची तत्वे शेवटपर्यंत जपली असे असले तरी मानवता हाच खरा धर्म आहे आणि सार्वजनिक ठिकाणी मानवता धर्माचेच आचरण करायला हवे असे ते म्हणत. महात्मा गांधींचे ते सच्चे अनुयायी होते. गांधीजींच्या आदेशानेच त्यांनी राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे ते काँग्रेसचे प्रमुख नेते बनले. इतकेच नाही तर वयाच्या अवघ्या ३५ वर्षी ते काँग्रेसचे अध्यक्षही बनले. काँग्रेसचे अध्यक्ष बनल्यावर त्यांनी हिंदू मुस्लिम ऐक्यावर भर दिला आहे. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. त्यात त्यांना अटक झाली. तुरुंगवास झाला पण त्यांनी देश स्वातंत्र्य करण्याचे जे व्रत स्वीकारले त्यातून माघार घेतली नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वातंत्र्य झाल्यावर पंडित नेहरूंच्या मंत्रिमंडळात त्यांना शिक्षणमंत्री म्हणून स्थान मिळाले. ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. शिक्षणमंत्री म्हणून त्यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत देशात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. त्यांचे शैक्षणिक धोरण धर्मनिरपेक्ष होते. आधुनिक शास्त्रे आणि आधुनिक विचार यांनाच त्यांच्या शैक्षणिक धोरणात प्राधान्य होते. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांचा जन्मदिवस शिक्षण दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. मौलाना अबुल कलाम आझाद यांचे वक्तृत्व प्रभावी होते तसेच ते उत्तम लेखक होते. कुराणाचा अनुवाद केलेला तरजुमानुल कोरोन हा त्यांचा ग्रंथ खूप प्रसिद्ध आहे. इंडिया विन्स हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले.

मौलाना आझाद यांना परराष्ट्र नीतीचा खूप अभ्यास होता. विशेषतः युरोपच्या तत्कालीन परिस्थितीचे त्यांना खूप ज्ञान होते. ते जितके तल्लख बुद्धीचे होते तितकेच ते मनमिळावू स्वभावाचे होते. लॉर्ड बटमली जे इंग्लंडच्या हाऊस ऑफ लोर्ड्सचे सदस्य होते ते मौलाना आझाद यांच्याविषयी म्हणतात मौलाना आझाद विशाल मनाचे व्यक्ती होते. देश स्वातंत्र्य व्हावा तसेच देशाची अखंडता कायम राहावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. १९९२ साली केंद्र सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. मौलाना आझाद यांचे २३ फेब्रुवारी १९५८ रोजी निधन झाले. जयंतीदिनी त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!



सेनापती बापट साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात विचार मांडताना सद्गुरू साहेबराव आवारे.

# जिल्हा-तालुकास्तरीय साहित्य संमेलन व्हावेत

### सेनापती बापट साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात सद्गुरू साहेबराव आवारे यांचे मत

नगर – अखिल भारतीयसह विभागीय व जिल्हा आणि तालुकास्तरीय साहित्य संमेलन होणे आवश्यक आहे. वाचन चळवळीच्या वृद्धीसाठी हे आवश्यक असल्याचे मत सद्गुरू साहेबराव आवारे यांनी व्यक्त केले.

स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. संजय नगरकर, आडसूळ शैक्षणिक संस्थेचे चेअरमन अनिरुद्ध आडसूळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड, राजेंद्र चोभे, रमेश आमले, वसंत कर्डिले, एड. संतोष गायकवाड, राहुल ठाणगे, भानुदास कोतकर, संदीप गेरंगे, राजेंद्र खुंटाळे, किसन सातपुते आदी उपस्थित होते.

सद्गुरू आवारे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाने असे विकेंद्रित पद्धतीने साहित्य संमेलन घेणे आवश्यक आहे. यामुळेच खऱ्या अर्थाने साहित्यिक व वाचक यांच्यातील संवाद वाढेल.

प्रास्ताविक सिद्धिनाथ मेटे महाराज यांनी तर, महादेव गवळी यांनी आभार व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. नगरकर यावेळी म्हणाले की, आई आपल्या लेकरासाठी ओव्या म्हणते हाच साहित्याचा खरा हुंकार आहे. अभिजात मराठी भाषेच्या विकास आणि उन्नतीमध्ये वाचक व साहित्यिक यांची एकत्रित भूमिका आहे. असा साहित्य संमेलनातून हे भावनिक बंध आणखी पक्के होतात.

# मौलाना अबुल कलाम आजाद यांना ११ नोव्हेंबरला किल्ल्यामध्ये अभिवादन



नगर – स्वतंत्रता सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या जयंतीनिमित्त मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी, रहमत सुलतान फाऊंडेशन व अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदे तर्फे ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता नेता कक्ष अहमदनगर किल्ला मध्ये त्यांना अभिवादन करण्यात येणार असल्याचे मौलाना अबुल कलाम आजाद महोत्सव समितीचे अध्यक्ष भैरवनाथ वाकळे यांनी कळविले आहे.

अहमदनगर किल्ल्यामध्ये साडेतीन वर्ष कैदेत असलेल्या नेता कक्षेतील मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या खोलीमध्ये त्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान यांनी केले आहे.

# हिंदू संघटन, सेवा, समरसता ही विश्व हिंदू परिषदेची उपलब्धी

### महेंद्र वेदक यांचे प्रतिपादन; विश्व हिंदू परिषदेचा विभागीय पदाधिकारी वर्ग

नगर – विश्व हिंदू परिषद स्थापनेपासून सेवा, समरसता आणि हिंदू संघटन या त्रिसूत्रीच्या आधारे समाजात कार्यरत आहे. परिषदची हीच खरी उपलब्धी आहे, असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री तथा अखिल भारतीय सह सत्संग प्रमुख महेंद्र वेदक यांनी केले.

अहिल्यानगर मध्ये आयोजित विभागातील प्रमुख पदाधिकारी वर्गात महेंद्र वेदक यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, प्रांत समरसता प्रमुख निखील कुलकर्णी, प्रांत प्रचार सहप्रमुख संजय गोडबोले, बजरंग दल सुरक्षा प्रमुख सुशांत गाडे, विभाग मंत्री सुनील खिस्ती, जिल्हा अध्यक्ष आशुतोष लांडगे, जिल्हा मंत्री विशाल वाघचौरे उपस्थित होते.

महेंद्र वेदक म्हणाले, श्रीराम जन्मभूमी आंदोलनापूर्वी अनेक हिंदूंना स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यात न्यूनगंड वाटत होता. परंतु आंदोलनाच्या यशानंतर मनामनात स्वाभिमान जागृत होऊन


विश्व हिंदू परिषदेच्या विभागीय वर्गाचे उद्घाटन करताना केंद्रीय महेंद्र वेदक.

परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. आज भारत जागतिक पातळीवर अग्रगण्य होऊ नये, यासाठी अनेक परकीय तसेच देशांतर्गत शक्ती प्रयत्नशील आहेत. भारताचीही श्रीलंका किंवा बांगलादेशा सारखी दुर्दशा व्हावी असे कुटिल डाव रचले जात आहेत. मात्र भारत सक्षमपणे या शक्तींना सडेतोड उत्तर देत प्रगती करत आहे. देव, देश आणि धर्म यांच्या पुनरुत्थानासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास हिंदुस्थान पुन्हा वैभवाच्या शिखरावर पोहोचेल.

कार्यक्रमात नितीन वाटकर यांनी आगामी कार्यक्रमांची रूपरेषा मांडली, निखील कुलकर्णी यांनी समरसता यात्रेचा आराखडा स्पष्ट केला, संजय गोडबोले यांनी प्रचारप्रसार योजना सादर केली, तर सुशांत गाडे यांनी बजरंग दलाच्या उपक्रमांविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संयोजन जिल्हा सहमंत्री शरद नगरकर, विरेंद्र शिंदे, श्रीकांत नांदापूरकर, राजेंद्र चुंबळकर, हिराताई शाहापुरे, जयश्री पोटे यांनी केले. प्रास्ताविक सुनील खिस्ती यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रताप तांदळे यांनी केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये १४ नोव्हेंबरला मोफत मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन



नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे जागतिक मधुमेह दिना निमित्त १४ नोव्हेंबर रोजी मोफत रक्तातील साखर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते २ यावेळेत सदर शिबिर होणार आहे. यात आहार तज्ज्ञांचा सल्ला मोफत दिल्या जाणार आहे. मधुमेह प्रतिबंध तसेच मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी वेळोवेळी तपासणी, तज्ज्ञांचे उपचार मार्गदर्शन आवश्यक आहे. यादृष्टीने जागतिक मधुमेह दिनाचे औचित्य साधून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरात तज्ज्ञ डॉ. वसंत कटारिया, डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. रविराज गवळी, डॉ. स्वप्निल शिंदे, डॉ. प्राजक्ता पारधे रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. मधुमेह रूग्णांचा आहार विहार, व्यायाम, नियमित तपासणी इत्यादी विषयी तज्ज्ञ डॉक्टर सविस्तर माहिती देतील.

आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनद्वारे सेवा उपलब्ध आहे. हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्ट सह ८०० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम आर आय २५०० रूपयात उपलब्ध आहे.

याशिवाय २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक सेवाही उपलब्ध आहे. शिबिराचा जास्तीत जास्त मधुमेह रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९४०३१८६३८७


शहर भाजपच्या ओबीसी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना नियक्ती पत्रे देताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, सरचिटणीस महेश नामदे व निखील वारे, विनायक देशमुख,,माजी नगरसेवक धनंजय जाधव, गणेश विद्दे, अशोक गायकवाड, रामदास आंधळे व बाळासाहेब भुजबळ आदींसह पदाधिकारी.

# भाजपची कायम ओबीसी समाजाला न्याय देण्याची भूमिका

### मंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन; शहर आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पात्रांचे वितरण

नगर – राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे सुरू झाले आहे. लवकरच महानगरपालिकेचेही पडघम वाजणार आहेत. अहिल्यानगर शहरातील भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तयारीसाठी कटिबद्ध व्हावे. ही निवडणूक आपण पूर्ण ताकदीने व जिंकण्याच्या निश्चयानेच लढणार आहोत. येणारा महापौर हा भारतीय जनता पार्टीचाच होण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी आजपासूनच कामाला लागावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नगर शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळत आहे. भाजपची कायम ओबीसी समाजाला न्याय देण्याची भूमिका आहे. त्यामूळे भाजपच्या ओबीसी आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी ओबीसी मधील सर्व घटकांना बरोबर घेत भारतीय जनता पार्टीचे कार्य, ध्येयधोरणे व केलेले विकास कामे त्यांच्यापर्यंत पोहोचवावेत, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

अहिल्यानगर शहर भाजपच्या ओबीसी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल म ोहिते, सरचिटणीस महेश नामदे व निखील वारे, विनायक देशमुख, माजी नगरसेवक धनंजय जाधव, ओबीसी मोर्चा अध्यक्ष गणेश विद्दे, महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जाणावे, अशोक गायकवाड, रामदास आंधळे, बाळासाहेब भुजबळ, ॲड.गाली आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी धनंजय जाधव म्हणाले, पालकमंत्री विखे यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली शहरात भाजपचे काम जोऱ्यात सुरु आहे. शहराच्या विकासासाठी मंत्री विखे यांनी मोठे सहकार्य करत निधी उपलब्ध करून दिला आहे. शहरातील ओबीसी समजतील सर्व घटक भाजपच्या झेंड्याखाली एकवटला आहे.

यावेळी ओबीसी आघाडीचे सरचिटणीस विनोद बोगा व रोहित पठारे, सहचिटणीस मुकुंद लखापती व कुंडलिक गदादे, युवा मोर्चा अध्यक्ष श्रीकांत फंड, मध्य मंडल अध्यक्ष सचिन पळशीकर, सदस्य शरद कोंडा, जितेंद्र बिजा, राजेश धवन आदींसह पदाधिकाऱ्यांना मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते नियुक्त पत्र देण्यात आली.

# आत्मध्यानामुळे जीवनात शांती व समभाव निर्माण होतो

### ११ नोव्हेंबर रोजी प्रवर्तकश्रीजींचा जन्मदिवस



वर्तमानकाळात प्रत्येक व्यक्तिचे जीवन हे धावपळीमुळे अस्तव्यस्त होत आहे. पद – पैसा – प्रतिष्ठा प्राप्तिसाठी जीवनात अशांतता निर्माण झाली व परिणाम स्वरुप मनुष्याला विविध आजार, संकटांना सामोरे जावे लागत आहे. यापासून मुक्ति मिळविण्यासाठी मनुष्य अनेकविध उपाय शोधत असतो. परंतु काखेत कळसा नि गावाला वळसा ही आज मनुष्याची व्यथा बनली आहे.

ज्यांनी संसार सुखाचा त्याग करुन आत्मकल्याण करण्याच्या हेतुने जैन भागवत दीक्षा राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म सा यांच्या चरणी घेतली, असे महान संत विभूती महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा यांचे पूर्ण जीवन शांती, समता, विश्वबंधुता इत्यादी सद्गुणांनी ओतप्रोत भरलेले आहे. अशा संत रत्ना चा ९२ वां जन्मोत्सव आनंदधाम येथे विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत आहे.

स्व – आत्म्यात उपजतच असलेली सुख – शांति ही आत्मध्यान च्या द्वारे निश्चित प्राप्त करता येते. जैन धर्मीयांचे वर्तमान आचार्य ध्यानयोगी श्री शिवमुनिजी म सा यांच्या अविरत साधनेमुळे आत्मध्यान ची उत्कृष्ट पध्दत जन माणसापर्यंत पोहोचत आहे. ७ नोव्हेंबर पासून होत असलेल्या पंच दिवसीय कार्यक्रमात ९ नोव्हेंबर रोजी आनंदधाम येथे सकाळी ६:३० ते ९:३० या वेळेत आत्मध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ३०० साधकांनी याचा लाभ घेतला. तसेच बालक – बालिकाओं करिता ड्राईंग स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

११ नोव्हेंबर रोजी प्रवर्तकश्रीजींचा जन्मदिवस आहे. या निमित्ताने जाप व गुरु गुणानुवाद सभा सकाळी ९ वाजता सुरू होईल. तरी सर्व श्रावक – श्राविकांनी याचा लाभ घ्यावा, असे श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.



मनोज जरांगे पाटील यांच्या सुरक्षेची मागणी संदर्भात अखंड मराठा समाज, अहिल्यानगर तर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.

# मनोज जरांगे पाटील यांच्या सुरक्षेची मागणी

## अखंड मराठा समाजाकडून पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – मराठा आरक्षण चळवळीचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या जीवावर घात करण्याचा कट रचल्याच्या पार्श्वभूमीवर अखंड मराठा समाज, अहिल्यानगर तर्फे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, मनोज जरांगे यांच्या हत्येचा कट रचल्याचे प्रकरण उघडकीस आले असून जालना पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या कटाचा मुख्य सूत्रधार माजी मंत्री धनंजय मुंडे असल्याचे आरोप होत असून, या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (SIT) नेमण्यात यावे, अशी मागणी अखंड मराठा समाजाने केली आहे. याचबरोबर जरांगे पाटील यांच्या सुरक्षेबाबतही निवेदनात गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील असून जनतेत अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांना तातडीने झेड प्लस दर्जाची सुरक्षा व्यवस्था देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना मिलिंद जपे, परमेश्वर पाटील, अभय शेंडगे, वैभव भोगाडे, माजी नगरसेवक मदन आढाव, दिलीप कोल्हे, गणेश नाईकनवरे, प्रमोद कोरडे, रत्नाकर दरेकर, अशोक पवार, श्रीपाद दगडे, गुंजाळ साहेब, रमेश मुंगसे, भारत भोसले, ॲड. अनुराधा येवले, कांताताई बोठे आणि मीनाक्षीताई वागस्कर आदींची उपस्थिती होती..

# धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी आ. जगताप, मुथा, गोंडाळसह ट्रस्टींविरुद्ध तक्रार

## जैन मंदिर ट्रस्ट प्रकरणी काळे, गुंदेचा यांनी दिली तक्रार

नगर – श्री ऋषभ संभव जिन जैन श्वेतांबर संघ (जैन मंदिर), कापड बाजार यांच्या मालकीच्या असणाऱ्या स्टेशन रोड वरील अक्षता गार्डन समोरील भूखंडावर असलेले मंदिर, प्रवचन स्थळ संगनमत करत पाडून धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी आ. संग्राम अरुण जगताप, गणेश हरिभाऊ गोंडाळ, ट्रस्ट अध्यक्ष सुभाषलाल झुंबरलाल मुथा, ट्रस्टचे सर्व ट्रस्टी यांच्या विरुद्ध कोतवाली पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल झाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर प्रमुख किरण काळे, जैन समाजाचे मनोज सुवालाल गुंदेचा यांनी ही तक्रार दिली आहे. पोलिस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्याकडे यावेळी तात्काळ सखोल तपास करण्याची मागणी काळे, गुंदेचा यांनी केली.

गुरुवारी पत्रकार परिषदेत माजी आ. रवींद्र धंगेकर, खासदार निलेश लंके यांनी तक्रार दाखल करणार असल्याचे म्हटले होते. त्यानंतर ही तक्रार दाखल झाली आहे. तक्रारीत म्हटले आहे की, ट्रस्टच्या नावे स्टेशन रोड वर वॉर्ड नंबर २१ मधील म्यु.क.नंबर ४४ याचा सि.स.नं. फायनल प्लॉट नंबर ११९ चे क्षेत्रफळ ४७१.९९ चौरस मीटर हा भूखंड आहे. या भूखंडावर असणाऱ्या मिळकतीच्या तपशिलाची नोंद नगरपालिका दप्तरी परिशिष्ट – अ मध्ये आहे. या भूखंडावर मंदिर होते. अशी नोंद तेव्हाची अहमदनगर नगरपालिका आणि आत्ताची अहिल्यानगर महानगरपालिका दप्तरी परिशिष्ट – अ मध्ये स्पष्ट नोंद नमूद आहे. त्याचे पुरावे काळे, गुंदेचा यांनी पोलिसांना दिले आहेत.



धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी आ. संग्राम अरुण जगताप, गणेश हरिभाऊ गोंडाळ, ट्रस्ट अध्यक्ष सुभाषलाल झुंबरलाल मुथा, ट्रस्टचे सर्व ट्रस्टी यांच्याविरुद्ध कोतवाली पोलिस स्टेशनमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर प्रमुख किरण काळे, जैन समाजाचे मनोज सुवालाल गुंदेचा यांनी तक्रार दिली.

तक्रारीत पुढे म्हटले आहे, जैन समाजाचे 'तीर्थंकर' भगवान ऋषभनाथ, भगवान महावीर यांनी जैन तत्त्वज्ञान शिकवले आणि आध्यात्मिक मार्गदर्शन केले. भगवान महावीरांचे उपदेश अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे) या महाव्रतांवर आधारित आहेत. आम्ही त्याचे आचरण करतो. जैन मंदिर ट्रस्टच्या वर नमूद भूखंडावरील मंदिर तसेच प्रवचन स्थळ पाडण्यात आले आहे. या मुळे आमच्या धार्मिक आस्था, भावना दुखावल्या गेल्या आहेत.

भारतीय न्याय संहिता (बीएनएस) च्या कलम २९८ नुसार कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळाला दुखापत करणे किंवा अपवित्र करणे हे कृत्य दंडनीय अपराध आह. या गुन्ह्यासाठी दोन वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा अशी तरतूद आहे. हा एक अजामीनपात्र व दखलपात्र गुन्हा आहे.

अपराध्यांवर बीएनएस कलम २९८ अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करावा अशी आम्ही तक्रार देत असल्याचे त्यात म्हटले आहे.

# वांबोरी चारीला स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले यांचे नाव देण्याची मागणी

## ४५ गावांच्या ग्रामस्थांकडून पालकमंत्र्यांकडे प्रस्ताव सादर

नगर – राहुरी, नगर, नेवासा आणि पाथर्डी तालुक्यांना संजीवनी ठरलेल्या वांबोरी चारी टप्पा–१ आणि टप्पा–२ या सिंचन योजनांना स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डीले यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी वैभव भाऊराव ढाकणे यांनी सर्व लाभधारक ग्रामस्थांच्या सहीसह जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

या योजनेमुळे सुमारे ४५ गावांतील १०२ पाझर तलावांना पाणीपुरवठा होत असून, डोंगराळ आणि दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या पाण्याच्या समस्या दूर झाल्या आहेत. १९९५ मध्ये तत्कालीन युती सरकारमधील उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे सतत पाठपुरावा करून ही योजना मंजूर करून घेण्यात स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले यांनी मोलाची भूमिका बजावली होती.



वांबोरी चारी टप्पा–१ आणि टप्पा–२ या सिंचन योजनांना स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डीले यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी वैभव भाऊराव ढाकणे यांनी सर्व लाभधारक ग्रामस्थांच्या सहीसह जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे. (छाया – लहू दळवी)

१९९०–९१ साली माजी खासदार डॉ. बाळासाहेब विखे पाटील आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांनी या प्रकल्पावर प्राथमिक बैठक घेतली होती. मात्र, कर्डीलेंच्या सततच्या प्रयत्नांमुळे १९९९ मध्ये योजनेला मंजुरी मिळाली आणि २०११ मध्ये ती कार्यान्वित झाली.

या प्रकल्पामुळे हजारो शेतकऱ्यांना कायमस्वरूपी सिंचनाचा लाभ मिळत आहे. म्हणूनच त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ या योजनेला स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले वांबोरी चारी टप्पा–१ आणि स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले वांबोरी चारी टप्पा–२ अशी नावे देण्यात यावीत, अशी मागणी अर्जामध्ये करण्यात आली आहे. या मागणीला सर्व लाभधारक गावांतील ग्रामस्थांचा पूर्ण पाठिंबा असून, या प्रसंगी सरपंच श्रीकांत आटकर, सोमनाथ कुरहे, शिवाजी पालवे, बाबाजी पालवे, अजिंक्य शिंदे, शरद कुरहे, देविदास शिंदे, निलेश कदम, आबा गरुड, संदीप दानवे, ओंकार आव्हाड आदी उपस्थित होते.

वैभव ढाकणे यांनी सांगितले की, शिवाजीराव कर्डीले साहेब यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आयुष्य झटवले. त्यांच्या नावाने ही योजना ओळखली जावी, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# २०२५ च्या निवडणुकीसाठी जातपडताळणी नियमात सुधारणा करण्याची मागणी

## मागील निवडणुकीतील सादर केलेले जातपडताळणी अर्ज या निवडणुकीतही ग्राह्य धरावे; सौ.सविता कोटा यांचे महसूल मंत्र्यांना निवेदन; 'नवा अर्ज नाही, जुने प्रकरण ग्राह्य धरा'

नगर – मागील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील जातपडताळणीचे सादर केलेले अर्ज या निवडणुकीतही ग्राह्य धरावे, नव्याने अर्जाची सक्ती नको असल्याची मागणी भारतीय जनता पार्टीच्या माजी जिल्हा सरचिटणीस तथा विद्यमान जिल्हा कार्यकारिणी सदस्य सविता प्रकाश कोटा यांनी केली आहे. या मागणीचे निवेदन कोटा यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवून जातपडताळणी प्रकरणांसंदर्भात महत्त्वाची मागणी केली आहे. त्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, मागील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत अनेक उमेदवारांनी निवडणूक लढविण्यासाठी जातपडताळणीचे अर्ज जातपडताळणी विभागाकडे सादर केले होते. मात्र काही उमेदवार निवडणुकीत पराभूत झाले असून, त्यांच्या प्रकरणांची नोंद नस्तिबंद करून प्रलंबित ठेवण्यात आली आहे. त्यामुळे अशा उमेदवारांना २०२५ च्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत पुन्हा नव्याने जातपडताळणीचे प्रकरण सादर करण्याची आवश्यकता राहू नये, मागील अर्जाच्या आधारेच पात्रता निश्चित करण्याचा नियम करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.





सविता कोटा यांनी म्हटले आहे की, मागील प्रकरणाची पावती जोडूनच आरक्षित जागेसाठी उमेदवारी दाखल करता यावी, असे नियम लागू करावेत. अशा नियमानंतर उमेदवारांची बरीच धावपळ, खर्च आणि वेळ वाचेल. प्रत्येक निवडणुकीवेळी नव्याने अर्ज करण्याची प्रक्रिया उमेदवारांसाठी त्रासदायक ठरते. प्रशासनाने मागील अर्ज व पावत्या वैध धरूनच उमेदवारांना संधी द्यावी, यामुळे पारदर्शकतेसह प्रक्रिया सोपी होईल. त्यामुळे निवडणूक तयारीसाठी अधिक वेळ देता येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# अहिल्यानगर महापालिका कर्मचारी पतसंस्थेतर्फे ४ मयत सभासदांचे रु. ३ लाख ५७ हजार कर्ज निवारण निधीतून माफ

## चेअरमन विजय कोतकर यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर या संस्थेचे संचालक मंडळ सभा चेअरमन विजय कोतकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.सदर सभेत ठराव क्र.८ नुसार कै.संजय आसाराम जाधव, कै.पारस भास्कर सोलंकी, कै. शुभम रमेश साठे आणि कै. प्रमोद मच्छिंद्र सुपेकर या मयत सभासदांचे एकूण रु. ३,५७,७०० कर्ज मयत सभासद कर्ज निवारण निधीमधून माफ करण्यात आले. या ठरावाची सूचना संचालक बाबासाहेब मुदगल यांनी मांडली, तर संचालक सोमनाथ सोनवणे यांनी त्यास अनुमोदन दिले. संचालक मंडळाने यापूर्वीही अनेक मयत सभासदांचे कर्ज या निधीतून माफ केले असून, सभासदांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी सातत्याने धोरणात्मक निर्णय घेतले जाऊन त्यांची अंमलबजावणी केली जाते. मयत सभासदांच्या वारसांनी संस्थेच्या संचालक मंडळाचे आभार मानले. त्यांनी संस्थेच्या पारदर्शक कारभाराचे व सभासदहित जोपासणाऱ्या धोरणांचे कौतुक करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. संस्थेने सर्व सभासदांचे हित जपण्याची परंपरा पुढेही अखंडपणे कायम राहावी, अशी अपेक्षा वारसांनी व्यक्त केली. या बैठकीस चेअरमन विजय कोतकर, व्हा. चेअरमन किशोर कानडे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक बाबासाहेब मुदगल, सतीश ताठे, विकास गिते, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, कैलास चावरे, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, प्रमिलाताई पवार, बाळासाहेब गंगेकर व कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत **१. श्री.सुदाम विठ्ठलराव बल्लाळ** रा. नवजीवन कॉलनी, अहिल्यानगर हल्ली मु. पुणे व **२.श्री. किशोर विठ्ठलराव बल्लाळ** रा. नवजीवन कॉलनी, अहिल्यानगर यांच्या मालकीची असून त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. त्यांनी सदर मिळकत विक्री बाबत आमचे अशिलांबरोबर व्यवहार केला असून आमच्या अशिलांकडून विसाराची रक्कम स्विकारुन आमच्या अशिलाच्या लाभात साठेखताचा दस्त लिहून नोंदवून दिला आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखीम व बिनबोजाची असून त्यामध्ये दुसऱ्या कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क, हितसंबंध अगर कब्जा नाही, खाजगी, सरकारी, बॅक, पतसंस्था इ. कर्जाचा बोजा नाही, सदर मिळकत कोणत्याही न्यायालयीन प्रक्रीयेत वादावा विषय नाही अशी त्यांनी आमच्या अशिलास खात्री दिली असून भरवसा दिला आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही **कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, खरेदीखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, वारसा हक्क, वहिवाट व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१५ (पंधरा) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवून आमची खात्री पटवावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणचीही कोणतीही तक्रार अगर हरकत चालणार नाही याची नोंद घेण्यांत यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

शहर अहिल्यानगर येथील मौजे चाहुराणा बु. भागातील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील पुनम मोती नगर येथील सर्व्हे नं.१५/१ ही नवजीवन को-ऑपरेटीव्ह सोसायटी/नवजीवन कॉलनी या नावाने ओळखली जाणारी ही बिगरशेती मंजूर लेआऊट मधील प्लॉट नं. १८ याचे क्षेत्रफळ २८२.७५ चौ.मी. यावर दुमजली बंगल्याचे बांधकाम केलेली इमारत त्याचे प्रत्येकी मजल्याचे क्षेत्र ९३.८३ चौ.मी.

**यांसी चतुःसिमा** –
पुर्वेस – नवजीवन कॉलनी मधील प्लॉट नं. १७ ची मिळकत
दक्षिणेस – चैतन्य कॉलनी पैकी श्री. उजागरे यांची मिळकत
पश्चिमेस – नवजीवन कॉलनी मधील प्लॉट नं. १९ ची मिळकत
उत्तरेस – रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत त्यातील तदंगभुत वस्तु सहित, वागणुकीचे व वहिवाटीचे हक्क, लाईट मीटर, नळ कनेक्शन इत्यादी सुद्धा काही एक राखुन न ठेवता

**ॲड. सुजाता सुनिल गुगळे**
३३५४, खिस्त गल्ली, आहिल्यानगर
मो.नं. ८६२५०८५८८२
दि. १०/११/२०२५.
अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने विशेषत : मौजे सावेडी, ता. अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर येथील खालील वर्णनाची मिळकत घेऊ इच्छिणाऱ्यांना कळविणेत येते की, **मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत सर्व्हे न. २७०/१/१ क्षेत्र : ०० हे. १८ आर. आकार ० रु. ६३ पैसे, गट नं. २४९/४ क्षेत्र :०० हे. ६७ आर, गट नं. २४९/८ क्षेत्र : ०० हे. ०५ आर आणि गट नं. २४८/३ क्षेत्र : ०० हे. २२ आर ह्या संपूर्ण मिळकती आमचे अशिल श्री. विकार अब्दुलहादी सय्यद यांचे वडिलोपार्जित मालकी वहिवाटीच्या असून, सदर मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाही व संपूर्ण मिळकती ह्या एकत्रीत समाईकात आहेत. सदर मिळकतींमध्ये आमचे अशिल यांचा मुस्लीम कायद्याप्रमाणे अविभक्त हिस्सा आहे, असे असताना आमचे अशिलांचे वडिल श्री. अब्दुलहादी अब्दुलसत्तार सय्यद व आमचे अशिलांचे तीन सख्खे भावांपैकी नं. ४ चा भाऊ श्री. सय्यद दानिश हादी हे दोघेही मिळून आमचे अशिलांचे सही संमती विना आमचे अशिलांचे विभक्त हिश्यासह उपरोक्त वर्णन केलेल्या मिळकतींचे बेकायदेशीरपणे विक्री करीत आहेत व सदरचे विक्रीस आमचे अशिलाची सक्त हरकत आहे. सबब उपरोक्त मिळकतींबाबत वरील इसमांसोबत कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी विक्रीचा व्यवहार, दस्त करु नये, केल्यास तो बेकायदेशीर ठरेल तसेच आमचे अशिलांचे हिश्यावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.

अहिल्यानगर
दिनांक :१०/११/२०२५
**ॲड.बशीर काझी**
ऑफिस : सर्व्हे नं.९५, के.के.मार्केट 'जी'विंग, २ फ्लोर, पुणे-सातारा रोड,धनकवाडी, पुणे-४११०४३
मो : 9881301895,Bashirkazi202@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे व व्यवहाराची बोलणी चालू आहे. सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून १५ दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार करतील; मग कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. **हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १०/११/२०२५**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** :

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील, **मौजे सावेडी** येथील **टि पी स्किम नंबर ४ मधील फायनल प्लॉट नंबर १०४ यामधील सब प्लॉट नंबर १ याचे क्षेत्र ६११.०० चौ.मी. व सब प्लॉट नंबर २ याचे क्षेत्र ६४९.०० चौ.मी. यावर बांधलेल्या इमारतीचे नांव "एपी सॉलिटेअर" यापैकी – ग्राऊंड फ्लोअर + मेझेनाईन फ्लोअर वरील मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे –**

**अ.) शॉप/युनिट नंबर १– याचे ग्राऊंड फ्लोअरचे कारपेट क्षेत्र ६३.९६ चौ.मी.+मेझेनाइन फ्लोअरचे कारपेट क्षेत्र ४५.२४ चौ.मी. असे एकूण कारपेट क्षेत्र १०९.२ चौ.मी. (एकुण विक्री योग्य क्षेत्र १४७.४२ चौ.मी.)**

| यांसी ग्राऊंड फ्लोअरच्या चतुःसीमा – | यांसी मेझेनाइन फ्लोअरच्या चतुःसीमा – |
|---|---|
| पूर्वेस : फ्रंट मार्जिन व रस्ता | पूर्वेस : डबल हाईट शॉप नंबर १ |
| दक्षिणेस : साईड मार्जिन | दक्षिणेस : साईड मार्जिन |
| पश्चिमेस : कॉमन लॉबी | पश्चिमेस : डबल हाईट कॉमन लॉबी |
| उत्तरेस : शॉप नंबर २ | उत्तरेस : मेझेनाइन शॉप नंबर २ |

ब.) शॉप/युनिट नंबर २– याचे ग्राऊंड फ्लोअरचे कारपेट क्षेत्र ६०.०६ चौ.मी. + मेझेनाइन फ्लोअरचे कारपेट क्षेत्र ४२.५१ चौ.मी. असे एकुण कारपेट क्षेत्र १०२.५७ चौ.मी. (एकुण विक्री योग्य क्षेत्र १३८.४६ चौ.मी.)

| यांसी ग्राऊंड फ्लोअरच्या चतुःसीमा – | यांसी मेझेनाइन फ्लोअरच्या चतुःसीमा – |
|---|---|
| पूर्वेस : फ्रंट मार्जिन व रस्ता | पूर्वेस : डबल हाईट शॉप नंबर २ |
| दक्षिणेस : शॉप नंबर १ | दक्षिणेस : मेझेनाइन १ |
| पश्चिमेस : कॉमन लॉबी | पश्चिमेस : डबल हाईट कॉमन लॉबी |
| उत्तरेस : शॉप नंबर ३ | उत्तरेस : मेझेनाइन शॉप नंबर ३ |

विद्यमान मालकांचे नाव
एपी इनकॉर्पचे प्रोप्रा–
आशिष रमेश पोखरणा
सर्जेपुरा, अहिल्यानगर.

**ॲड. आर.टी.शर्मा**
**ॲड.अंकिता अनिल शर्मा (पगारिया)**
मो.नं.९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७ पहिला मजला,
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेला प्लॉट मिळकत विद्यमान मालक **सौ.मनिषा संजय सांगळे रा.नाशिक** यांचे मालकी वहिवाटीचा असून यांनी सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असून सदरची मिळकतीचे खरेदी–विक्रीचा तोंडी करारनामा आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व व्यवहारापोटी विसार म्हणून रक्कम सुध्दा घेतलेली आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट** : **मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता. नगर पैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे बुऱ्हाणनगर येथील बिगरशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट..नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ८ २/१ | ०.५७ | ०.९० |

**या संपुर्ण शेतजमिन मिळकतीबाबत.**
**यांसी चतुःसिमा – मुळ नकाशाप्रमाणे**

दि.१०/११/२०२५
अहिल्यानगर.
विद्यमान मालक, सही व अंगठा

**ॲड. एस.एन.भोगाडे** एम.ए.एल.एल.बी.,
पत्ता : स्टेट बँक चौक, अहमदनगर-४१४००१
मो : ९४२०३३५५३५, ८२०८७३०७००

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **बाळासाहेब नामदेव इंगवले , रा. गणेश खिंड रोड, ११ जवाहर नगर पुणे विद्यापीठ रोड,पुणे शहर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर जमीन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत,असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध,ताबा, मनाई, दावा,लिज,गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस,पोटगी हक्क,सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही,असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट** : **मिळकतीचे वर्णन :**
डि.।। अहिल्यानगर/अहमदनगर सब.डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील भिंगार येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | हे.आर. | रु.पै. |
|---|---|---|
| २०८/५ | ०.६० | ०.५७ |

**या संपुर्ण जमिनीबाबत. यांसी चतुःसिमा–**
पुर्वेस – लागु सर्व्हे नंबर २०८/६, दक्षिणेस – १२ मीटर रस्ता व सर्व्हे नंबर २०९
पश्चिमेस – शिव रस्ता, उत्तरेस – लागु सर्व्हे नंबर २०८/१/२
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखून न ठेविता.
दि.१०/११/२०२५
अहमदनगर.

ॲडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक
डावरेगल्ली, जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी
अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, आमच्या अशिलाची खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार करणेबाबतची बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांबरोबर चालू आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. **ता.१०/११/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर हद्दीतील **मौजे सावेडी येथील टि.पी.स्कीम नं.४ मधील** खालील वर्णनाची प्लॉट मिळकत – **टि.पी.स्कीम नं.४ मधील फायनल प्लॉट नं.४३/१७ चे एकूण क्षेत्रफळ ३१०.५० चौ.मी. हा संपूर्ण प्लॉट, यांसी चतुःसिमा :–**
पुर्वेस :– फायनल प्लॉट नं. ४३/१५ व ४३/१६ दक्षिणेस :– रस्ता
पश्चिमेस :– फायनल प्लॉट नं. ४३/१८ उत्तरेस :– फायनल प्लॉट नं. ४९/२९
वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –
**१.विशाल सुरेंद बक्षी, २. शितल अमित सेठी, व ३. श्रृती सागर व्होरा.**
रा. बंगला नं.१९,साधु वासवाणी सोसायटी,
पत्रकार वसाहती मागे,
हडको रोड, सावेडी,
अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर
मो. नं. 9011678999. 9860805559

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१) अनीलकुमार रामगोपाल सोनी, २) नंदकिशोर उर्फ नंदकुमार रामगोपाल सोनी यांचे खरेदी मालकी वहिवाटीची व ३) मंगला राजेंद्र सोनी, ४) श्रेयस राजेंद सोनी यांचे वारसा मालकी हक्काची** आहे व सदर मिळकतीवर फेरफार नं.३१७१६ अन्वये मालमत्ता पत्रकावर नोंद झालेली असून सदर मिळकत वरील नमूद मालकांच्या प्रत्यक्ष ताबे कब्जात आहे. सदर मिळकतीचे विक्री करण्याचा करार आमचे अशिलांबरोबर करुन कायमखूष खरेदी देण्यांचे ठरविले आहे तसेच व्यवहारापोटी रक्कम स्वीकारुन त्यास सर्व कायदेशीर वालीवारसांची संमती आहे असा भरवसा दिलेला आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व तोंडीबोली व खाजगी सावकार यांचेकडे गहाण नाही, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे चालू वाद, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, कर्ज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस, रद्दलेख, साठेखत, खरेदीखत कोणतेही हक्क व अधिकार व हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :**– जिल्हा तुकडी अहमदनगर पो.तु.ता.नगर पैकी **शहरनगर** येथील महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|
| १३०८/१ | १०२.०० चौ.मी. |

ही संपुर्ण जागा व त्यावरील लोडबेअरींगमधील बांधकामासह मिळकत. यातील इले.लाईट मिटर व नळ कनेक्शनसह व वहिवाटीचे व वागणुकीचे हक्कासह काही एक राखून न ठेविता...

**यांसी चतुःसिमा**–
पुर्वेस – सिटी सर्व्हे नं. १३०८/२ दक्षिणेस – बोळ
पश्चिमेस – सिटी सर्व्हे नं.१३०९ उत्तरेस – सिटी सर्व्हे नं.१२९८ व १३०५
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत. वर उल्लेख केलेल्या मिळकतीच्या चतु:सिमा यदाकदाचित नजरचुकीने चुकीच्या असल्यास सरकारी रेकॉर्ड प्रमाणे व कब्जेप्रमाणे असलेल्या चतु:सिमा ग्राह्य व अंतीम राहतील.

दि.१०/११/२०२५
अहिल्यानगर

**ॲड.पियुष प्रविण पुरोहित**
बी.एस.एलएल.बी., धर्माधिकारी मळा,
सावेडी,अहिल्यानगर, मो : ९८२२००९२७२

## ग्रामपंचायत मंजूर, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर
## बी–१ निविदा

ग्रामपंचायत मंजूर ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर खालील कामासाठी नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी–१ निविदा दरपत्रके मागवण्यात येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे मंजूर येथील हंडेवाडी फाटा येथे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे . | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे. | सु.बे. | ४ लक्ष |

**काम पूर्ण करण्याचा कालावधी : ६ महिने**
**अटी व शर्ती** १) निविदा व माहितीपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात दि.१०/११/२०२५ ते दि.१७/११/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील.२) निविदा दि.१८/११/२०२५ रोजी १०.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सरपंच/ग्रामसेवक अधिकारी**
**ग्रामपंचायत मंजूर, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर**

## ग्रामपंचायत चासनळी, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर
## बी–१ निविदा

ग्रामपंचायत चासनळी, ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर खालील कामासाठी नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी–१ निविदा दरपत्रके मागवण्यात येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे चासनळी येथील धेनकवस्ती मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे. | सु.बे. | १० लक्ष |

**काम पूर्ण करण्याचा कालावधी : ६ महिने**
**अटी व शर्ती** १) निविदा व माहितीपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात दि.१०/११/२०२५ ते दि. १७/११/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील.२) निविदा दि.१८/११/२०२५ रोजी १०.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चासनळी,ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर**

## ग्रामपंचायत धामोरी, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर
## बी–१ निविदा

ग्रामपंचायत धामोरी ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर खालील कामासाठी नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी–१ निविदा दरपत्रके मागवण्यात येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे धामोरी येथील नंदीनगर येथे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे. | सु.बे. | ३ लक्ष |
| मौजे धामोरी येथील नवनाथ नगर येथे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे. | खुला | २,५०,०००/- |

**काम पूर्ण करण्याचा कालावधी : ६ महिने**
**अटी व शर्ती** १) निविदा व माहितीपत्रक ग्रामपंचायत कार्यालयात १०/११/२०२५ ते १७/११/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळतील.२) निविदा दि. १८/११/२०२५ रोजी १०.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत धामोरी, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर**

